विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१७ |
| वर्ष | : | बावनवे |
| अंक | : | पहिला |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१७**

**गणपत्रिका क्रमांक : १९१**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : बावनवे अंक : पहिला चैत्र/ वैशाख शके १९३९, एप्रिल २०१७

## *संपादकीय*

### गुढीपाडवा, पंचाग आणि ढोल

महाराष्ट्रामध्ये नुकताच आपण गुढीपाडवा साजरा केला.

गुढीपाडवा म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा. हिंदू वर्षाचा तो पहिला दिवस. आपल्या कालगणनेप्रमाणे शालीवाहन शके १९३९ चालू झाले. हेमलंबीनाम संवत्सराची सुरुवातही या गुढीपाडव्यापासूनच झाली. गुढीपाडवा हा साडेतीनमुहुर्तांपैकी एक मुहुर्त. सगळ्या चांगल्या नवीन कामाला सुरुवात आपण गुढीपाडव्याला करतो. गुढी हे एक त्या नावीन्याच, मांगल्याचे प्रतिक म्हणून प्रत्येक घरामध्ये गुढी उभारुन हा सण आपण साजरा करतो.

महाराष्ट्रात आपण नवीन वर्ष जरी चैत्रामध्ये सुरु करत असलो, तरी भारतामध्ये काही ठिकाणी नवीन वर्षाची सुरुवात, कार्तिक किंवा आषाढ महिन्यापासूनही होते. आपल्या सगळ्या सणांचा कुठेना कुठेतरी निसर्गाशी संबंध आहे. सर्वसाधारणपणे आपल्याला उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे हवामानातले बदल माहित असतात. निसर्गामध्ये शेतीपासून वनस्पतींवरही या बदलाचे अनेक परिणाम होत असतात. हे कालचक्र काही हजारोवर्ष चालू आहे. त्याचे प्रतिबिंब आपल्या साहित्यामध्येही पडलेले आपल्याला दिसते.

हिंदू वर्षाचे बारा महिने हे या निसर्गक्रमाने वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर अशा सहा ऋतुंमध्ये विभागले गेले आहेत. आहारापासून, उत्सवापर्यंत पाळायच्या किंवा साजरा करायच्या पद्धतींची नाळ ही त्या ऋतुमधील निसर्गाच्या बदलाशी जोडलेली असते. साहजिकच हिंदूचे वैद्यकशास्त्र म्हणजे

(पृष्ठ क्र. २८ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**५) दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५,
भ.क्र.: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ.(आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


संपादकीय १

देणगीसंबंधी निवेदन २

संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार ४

ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । नागेशं दारुकावने। ५

गीतकृष्णायन-भाग ४- योगेश्वर ६

''वारकरी संप्रदाय'' ९

आत्मरूप आत्मारामाची आचार संहिता १८

कौटिल्यीय अर्थशास्त्र २४

जुन्या भारतीय रूढी व परंपरा आणि आजचा भारत २६


आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती - बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते.

गेली अनेक दशके गिरगांवातील '**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**' कापडाचे व्यापारी श्री. सुहास व अनिल लघाटे हे सद्धर्मसाठी देणगी स्वीकारण्याचे काम अविरतपणे चोख करत असत. पण काही व्यक्तीगत कारणामुळे १ एप्रिल, २०१७ पासून तेथे देणगी स्वीकारता येणार नाही असे त्यांनी कळविले आहे. तरी आता त्यांच्याकडे देणगी स्वीकारली जाणार नाही याची सर्व देणगीदारांनी कृपया नोंद घ्यावी. त्यांनी इतके दिवस व्यक्तिशः केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही सर्व विश्वस्त त्यांचे ऋणी व आभारी आहोत. **- संपादक**

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

**जानेवारी ते मार्च २०१७**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

भिडे नारायण माधव, नाशिक

कुमार के. देसाई, दहिसर

**ऐच्छिक / विशेष देणगी**

दीक्षित मुकुंद कमलाकर डोंबिवली रु.१०००/-

लिमये शरद शंकर, गोरेगांव मुंबई - रु.५००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३० वा

**हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः।।**[३६४]

अरे बाबा, पैसा मिळव. ह्या जगात गुणांची काही किंमत नाही.

बाकी तीन ओळी :

**बुभुक्षितैः व्याकरणं न भुज्यते**
**पिपासितो काव्यरसो न पीयते**
**न विद्यया केनचिदुद्धृतं कुलम्**
**हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः।।**

भुकेलेल्या माणसाची भूक व्याकरण भागवू शकत नाही. तहानलेल्या माणसाची तहान काव्याचा रस शमवू शकत नाही. विद्येने आत्तापर्यंत आपल्या कुळाची भरभराट झालेली नाही. म्हणून सुभाषितकार म्हणतो गुणांनी काही किंमत नाही. जगात पैसा हेच सर्वस्व आहे.

**सर्वलोकपरितोषकारको नास्ति तत्र खलु कश्चिदुपायः।।**[३६५]

सर्वांचे समाधान करणे कधीच शक्य होणार नाही. (कारण लोक पायी चालू देत नाहीत व घोड्यावरही बसू देत नाहीत)

पहिली ओळ : **सर्वदा स्वहितमाचरणीयं, किं करिष्यति जनो बहुजल्पः।**

माणसाने स्वतःच्या मनाला व सद्सद्विवेकबुद्धिला पटेल असेच वागावे. कारण लोक दोन्हीकडून बोलणारे असतात. याबाबतीत मुलगा वडील आणि गाढव यांची गोष्ट सर्वांना माहित आहे.

**सुधा भीता दिवं गता।**[३६६]

अमृत घाबरले आणि स्वर्गात निघून गेलो.

**द्राक्षा म्लानमुखी जाता शर्करा च अश्मतां गता।**
**सुभाषित रसं दृष्ट्वा सुधा भीता दिवं गता।**

सर्व रसांमध्ये सुभाषितरसच उत्तम आहे हे सांगण्यासाठी सुभाषितकार म्हणतो हा रस पाहून द्राक्षावेलीचे मुख कोमेजले, साखरेचा दगड झाला आणि अमृत तर घाबरून स्वर्गात पळूनच गेले.

**संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः किदृशः ?**[३६७]

तहान लागल्यावर विहीर खणणे कितपत शहाणपणाचे आहे?

**यावत्स्वस्थमिदं शरीरमरुजं**
**यावज्जरादूरतो**
**यावच्चोन्दियशक्तिरप्रतिहता**
**यावत्क्षयो नायुषः।**
**आत्मश्रेयसि तावदेव विदुषा**
**कार्यः प्रयत्नोमहान्**
**संदिप्ते भवने तु कूपखननं**
**प्रत्यद्यम् कीदृशः।।**

जोपर्यंत हे शरीर निरोगी आहे, कोणत्याही प्रकारचा रोग झालेला नाही, जो

(पृष्ठ १७ वर)

## ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । नागेशं दारुकावने।

दि. दा. औटी

लेख ८ वा

**याम्ये सदङ्गे नगरेऽतिरम्ये**
**विभूषिताङ्गं विविधैश्च भोगैः।**
**सद्भक्तिमुक्तिप्रदमीशमेकं**
**श्रीनागनाथं शरणं प्रपद्ये।।**

अन्वयः

**याम्ये अतिरम्ये सदङ्ग नगरे, विविधैः भोगैः विभूषिताङ्गं सद्भक्तिमुक्तिप्रदम् एकम् ईशं श्रीनागनाथम् अहं शरणं प्रपद्ये।**

भाषांतर :

दक्षिणेकडील अतिशय रम्य अशा सदङ्ग नगरात (वास्तव्य करणाऱ्या) व अनेक प्रकारच्या भोगांनी शरीर विभूषित केलेल्या, सद्भक्ती आणि मुक्ती देणाऱ्या एकमेव ईश्वराला नागनाथाला मी शरण आलो आहे.

दारुका वनातील औढ्या नागनाथ हे भगवान शंकराचे ज्योतिर्लिङ्ग मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात आहे. नागेशाचे मंदिर शिल्प सौंदर्याचा एक उत्तम नमुना आहे. पांडवकालीन दगडी बांधणीचे हे भव्य आणि मजबूत मंदिर आहे. मंदिरा भोवती भक्कम तट आहे. सभा मंडप आठ खांबावर द्वादशकोनी वर्तुळाकार आहे.

नागेशाची मुख्य पिंड आतील छोट्या गुप्त गाभाऱ्यात आहे. अभिषेकासारखा धार्मिक विधी करण्यासाठी तळघरात उतरुन जावे लागते व तिथे ऑक्सीजन फार कमी पडतो. उदबत्ती अथवा निरांजन लावण्यासाठी काड्यांची पेटी पेटत नाही.

येथे महादेवासमोर नंदी नाही. मुख्य मंदिराच्या मागच्या बाजूस नंदिकेश्वराचे स्वतंत्र मंदिर आहे.

ह्या देवालयाच्या विषयी बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत. संत नामदेवाला विठोबा खेचर हे ह्याच देवळात भेटले. त्या वेळेस ते विश्रांतीसाठी पिंडीवर पाय ठेवून विश्रांती घेत होते. हे पाहून नामदेवांना धक्काच बसला. इत्यादी कथा सर्वविदित आहे.

नामदेव महाराज देवळापुढे कीर्तन करीत असत. याचा त्रास देवळात मंत्र म्हणणाऱ्या ब्राह्मणांना होऊ लागला म्हणून त्यांनी नामदेवाला देवळाच्या मागे जाऊन कीर्तन करायास सांगितले. नामदेवांनी तसे केल्यावर सबंध देऊळच फिरले व नामदेवांसमोर देवळाचा पुढचा भाग आला. त्यावेळी ब्राह्मणांना नामदेवाचे महत्त्व कळले.

औरंगजेबाने हे देऊळ पाडण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या सैन्यावर हजारो भुंगे येऊन तुटून पडले व औरंगजेबाचा देऊळ पाडण्याचा प्रयत्न फसला.

ह्या भागाचे नाव दारुका वन पडले. याचे कारण पार्वतीची भक्तीण दारुका नावाची राक्षसीण होती. तिचा येथे संचार होता. तिच्या स्मरणार्थ दारुकावन असे नाव पडले असे सांगतात. इति शिवम्। क्रमशः

**दि. दा. औटी**

●●●

## 'द्वारका निवास' - वृत्त मालिनी

हरिचरित पहाता भाग्य आकार घेते
सुखमय जिवनाची श्रीगणेशाच होते
लवकर रसिका ये द्वारकेमाजि जाऊ
प्रतिदिन हरि कैसा कंठतो काल पाहू ॥१ ॥

गगन सदन मार्गे ये उषा पंचकाली
अलगद उठवी जो तीन लोकांस वाली
पदरव न करी तू ध्यान भंगेल त्याचे
प्रथमच असते जे स्वानुसंधान साचे ॥२ ॥

इतर मग करी तो स्नानसंध्यादि कर्मे
दिनभर करण्याला नेमिली जी स्वधर्मे
सकळ वडिलधाऱ्या यादवां मान देई
कुशल तव पुसोनी याचकां दान देई ॥३ ॥

तुरग चपल येई घेउनी सारथी तो
धवल रथ निघे मंत्रालयी कृष्ण जातो
यदुकुलविर मंत्री ज्या सभे भूषवीती
खल करुन हरी दे त्या सभेलाच कीर्ती ॥४॥

प्रहर उलटताना भोजना कृष्ण येई
उदरभरण होता शांत विश्रांति घेई
सकळजनसखा तो भेटतो पीडितांसी
श्रवण करत दुःखे होत अज्ञातवासी ॥५॥

सफल दिन क्रमूनी भानु अस्तास जातो
बघ हळु रसिका तू कृष्ण व्यायाम घेतो
विविध कठिण शस्त्रे पेलण्या कोण येतो
सहज सुलभतेने श्रीहरी चालवीतो ॥६॥

उरकत हरि संध्या ऐकतो वा कथेला
गुज करि बलरामा संगती वाटिकेला
हितकर मज सांगे काय होई प्रजेला
त्वरितच निभवू रे धर्म जो लोकपाला ॥७॥

हसत मग विनोदे अल्प आहार होतो
शयन भुवन मार्गा श्रीहरी आक्रमीतो
मनन करुन तत्वा तोषुनी आळवीतो
शयन सुखद होण्या दीप तो मालवीतो ॥८ ॥

तिन्ही लोकांत अनिर्बंध संचार करत असताना नारदमुनी एके दिवशी इंद्रप्रस्थाला पोहोचले. युधिष्ठिरानं पांडवांच्या राज्यसभेत त्यांचं अत्यादरानं स्वागत केलं. त्या स्वागतानं आणि पांडवांच्या प्रगतीनं संतोष पावून नारद म्हणाले,

धर्मा, तुझ्या अतुल पराक्रमी भावांच्या सहाय्यानं तुला आता सबंध पृथ्वीतलावर अधिपत्य मिळवणंही अशक्य नाही. ह्या अलौकिक सामर्थ्याचं प्रतीक म्हणून तू आता राजसूय यज्ञ करावास हे उचित!

आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे देवर्षी, धर्म नम्रतेनं म्हणाला, आमचा पाठिराखा आणि परमस्नेही श्रीकृष्ण याला मी लागलीच द्वारकेहून बोलवून घेतो. पांडवांचं सामर्थ्य अतुलनीय असलं तरी त्याच्या मार्गदर्शनाखाली पावलं उचलली तरच हा यज्ञ निर्विघ्नपणे सिद्धिला जाईल अशी माझी मनोदेवता मला सांगत्येय.

रसिकहो, सुहृदांची हाक ऐकून धावत न आला तर तो कृष्ण कसला? यावेळेला कृष्णानं आपल्यासमवेत आपल्या आठ राण्यादेखील घेतल्या होत्या. या सर्वांचं स्वागत करताना इंद्रप्रस्थातील जनतेच्या उत्साहाला उधाण आलं. कुंकुमाच्या सड्यांनी आणि लतापल्लवांनी त्यांनी सारे मार्ग सुशोभित करून टाकले. जागोजाग नगारे वाजू लागले. कृष्ण जाईल तिथे तिथे त्याचा जयजयकार आणि सत्कार होऊ लागला.

स्वागताच्या उत्साहाचा पूर अंमळ ओसरल्यावर कृष्णाबरोबर पांडवांची बैठक झाली. धर्मराजानं नारदांची सूचना कृष्णाच्या कानावर घालून त्याच्या मार्गदर्शनाची याचना केली. क्षणमात्र विचार करून कृष्ण म्हणाला, धर्मा, मगध नरेश जरासंधाला स्वसामर्थ्याचा विलक्षण गर्व आहे. म्हणून तो तुझ्या राजसूय यज्ञात विघ्न निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. शिवाय गुप्तहेरांकरवी मला एक बातमी मिळाल्येय. जरासंधानं स्वसामर्थ्याचा गैरवापर करून अनेक राजांना बंदिवान केलंय हे आपल्याला माहितच आहे. आता पुरुषमेध यज्ञ करून त्या सर्व राजांना तो यज्ञवेदीवर बळी देण्याचे मनसुबे करतोय.

किती भयंकर! किती निर्घृण! पांडवांनी उद्गार काढले.

यास्तव राजसूय यज्ञाचा घाट घालण्याआधी त्याचा पूर्ण बंदोबस्त करणं मला नितांत आवश्यक वाटतं. एकदा ही विषवल्ली उपटली गेली की अन्य कोणी तुम्हाला आडकाठी करण्यास धजावेलसं वाटत नाही.

तुझा सल्ला रास्त आहे कृष्णा, विचार करून धर्मराज म्हणाला, मग यासाठी आपण काय करावं असं तुला वाटतं?

माझ्याबरोबर भीमार्जुनांना घेऊन मी मगधास जातो. कृष्णानं सुचवलं, जरासंधाला आमच्यापैकी कोणाबरोबरही मल्लयुद्ध करण्याचं आव्हान देतो. मला खात्री आहे गर्वोन्मत्त जरासंध भीमाचीच निवड करेल. मग भीम मल्लयुद्धात त्याचा सहजच वध करेल. तुला हे मान्य आहे ना?

धर्म भारावून म्हणाला, कृष्णा, स्वयमेव तू रक्षणकर्ता असताना जरासंधच काय पण तिन्ही लोक वैरी झाले तरी भीमार्जुनांचा केसही वाकडा होणार नाही असा माझा अढळ विश्वास आहे...

**'मगध विजय' - जाती भवतरी**

अद्वितीय मल्लयुद्ध तुंबळ घडले
भीमाने जरासंध दैत्या वधले
संगतिला कृष्णाने वीर चांगले
भीमार्जुन घेत मगध राज्य जिंकले ॥धृ ॥

मगधपती जरासंध
यज्ञ रची पुरुषमेध
देण्या बळि निरपराध
कारागृहि ज्या नृपांस बळे कोंडले ॥१॥

चंदन उटि फुलमाला
शोभविती कायेला
राहण्या अतिथि शाला
भेटीस्तव मगधपतिस झणि बोलविले ॥२॥

कृष्ण वदे आम्ही व्रति
येइ त्या व्रतास पूर्ति
जरि देऊ तुज सद्गति
हो तयार भोग आज निजकर्मफले ॥३॥

जरि असलो आम्हि तिघे
युद्धा नच करु अवघे
लढण्या तू निवडुन घे
अमुच्यातिल एक जेच योग्य वाटले ॥४॥

जरासंध क्रोधतसे
भीमाला निवडतसे
प्रतिस्पर्धि युद्धमिसे
गर्वाने वदे पार्थ हरी कोवळे ॥५॥

होत सुरू मल्लयुद्ध
पेचांनी करति बद्ध
मगधवासि बालवृद्ध
अप्रतीम दृश्य पाहण्यास लोटले ॥६॥

जाहली जणूच वृष्टि
कायांवरि वज्रमुष्टि
आंदोळत सर्व सृष्टि
तेरा दिन ते भयाण युद्ध चालले ॥७॥

अखेरीस भीमाने
निकराच्या पेचाने
उचलुन अति वेगाने
मगधपतिस धरणीवर बळे पाडले ॥८॥

हातांनी धरुन हात
पायांवर पाय देत
भीमाने त्या क्षणात
सिंहनाद करुनी मग चिरुन टाकले ॥९॥

सैन्यासि अभय देउन
कारागृहि मग जाउन
द्वारांना भंग करुन
वीरांनी बंदिवान नृप सोडविले ॥ १०॥

सहदेव शरण आला
पाहुनि त्या पुत्राला
कृपावंत हरि झाला
सिंहासनि मगधाच्या त्यास बसविले ॥११॥

धर्मराजानं केलेला राजसूय यज्ञाचा सोहळा केवळ अपूर्व अशा रितीनं संपन्न होत होता. देशोदेशींचे राजे अनेक प्रकारचे आहेर आणि करभार घेऊन त्या यज्ञाला उपस्थित होते. धर्मानं कौरवांना हस्तिनापुराहून अतिशय प्रेमानं आणि आग्रहानं बोलवून घेतलं होतं. यजमानांकडचे सर्वच यज्ञ यथासांग पार पडावा म्हणून राबत होते.

त्या यज्ञसोहळयाचं नेत्रदीपक वैभव काय वर्णावं?

पांडव यज्ञामधील विधी यथाशास्त्र पार पाडतायत, राजगुरू द्रोणाचार्य जातीनं यज्ञसमारंभाकडे ध्यान पुरवतायत, विदुर व्ययविभागाकडे लक्ष ठेवून आहे, दुःशासन भोजनविभाग सांभाळतोय, ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची जबाबदारी कृपाचार्यांनी उचलल्येय, अश्वत्थामा आणि संजय आलेल्या राजांचा सत्कार करतायत, दुर्योधन नृपालांनी दिलेला करभाग एकत्र करून त्याचा हिशेब ठेवतोय, आणि स्वतः श्रीकृष्ण??

तो उपस्थित ब्राह्मणांचं स्वतःच्या श्रीकरांनी चरणप्रक्षालन करतोय!!!

मंडळी, अशा यज्ञसोहळयामधे काय उणं असणार सांगा बरं? खरंच, पांडवांच्या, किंबहुना तिथे उपस्थित सर्वांच्याच, भाग्याचा हेवा स्वर्गीच्या देवतांनीही करावा! तर अशा ह्या समारंभाला कोणाचीच चुकुनही दृष्ट लागू नये

(पृष्ठ २५ वर)

''वारी'' हा शब्द कानी पडताच आठवण येते ती पंढरपूरला होणाऱ्या आषाढवारीच्या सोहळ्याची. महाराष्ट्रातून आळंदी, देहू, त्र्यंबकेश्वर, सासवड, एदलाबाद, पैठण, शेगांव इ. प्रसिद्ध संतांचे गांवाहून त्यांच्या पालख्या पंढरपूरला आषाढी एकादशीस जाण्यास हजारो भक्तांसह प्रस्थान ठेवतात. सर्वजण श्रीविठ्ठलाचे दर्शनासाठी भूवैकुंठ पंढरपुरला जाण्यास हरिनामघोषात ऊन, वारा, वादळ, पाऊस कश्याचीही पर्वा न करता वाटचाल करतात. तसेच कार्तिकी एकादशीसही आळंदी व पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणांवर भक्तांची रीघ लागते. दिंड्या, पताका, टाळ नी सूदुंग यांनी हा सोहळा कसा लक्षवेधी, भक्तीरसानंदाचा होतो. ''वारी'' याचा अर्थ येरझार हा जरी असला तरी भक्तीसंप्रदायात त्यास एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. तो म्हणजे आपल्या आराध्य दैवताचे दर्शनास विशिष्ट महिन्यात विशिष्ट दिवशी नित्यनियमाने जाणे. ज्ञानेश्वरीत वारी हा शब्द येरझार याअर्थी आलेला आहे. अश्या विशिष्ट दैवताचे भक्तगण जेव्हा एकत्र येऊन प्रस्थान ठेवतात त्यास दिंडी म्हणतात. या दिंड्या अनेक ठिकाणाहून निघतात व त्या आराध्यदैवताचे परमभक्तचे ठिकाणी / गांवी एकत्र येऊन ह्या परमभक्ताचे पालखीबरोबर आराध्यदैवताचे ठिकाणी जातात. हा पालखी सोहळा.

या भारतवर्षात अश्या पद्धतीने अनेक देव देवतांच्या वाऱ्या करणारे आहेत. बद्रिकेदार, वैष्णोदेवी, अमरनाथ, गाणगापूर, अक्कटकोट. काशीविश्वेश्वर, त्र्यंबकेश्वर, उज्जैन, रामेश्वर, तिरुपती, शबरीमलेयै, शेगांव शिर्डी इ. मुसलमानही हाज यात्रा करतात नित्यनेमाने तीहि वारीच. प्रत्येक धर्माचे पवित्रतम ठिकाणी त्या त्याधर्माचे लोक विशिष्ट पुण्यपद दिवशी नित्यनियमाने येरझार करत असतातच. जगन्नाथपुरी, द्वारका, सोरटी सोमनाथ, गया, अजमेर, पावापुरी, चंपापुरी इ. असंख्य पवित्र स्थाने आहे व त्याठिकाणी नित्यनियामने जाणारे भक्त आहेत.

वारी करणारा तो वारकरी अशी वारकऱ्याची व्याख्या करता येईल, म्हणजे सर्व धर्मात वारकरी आहेतच. प्रत्येक धर्माचे, संप्रदायाचे वारकरी असतातच व त्यांच्या दैवतांच्या उत्सव/उरूस/पुण्यतिथी/जयंती इ. साठी ते कधी वेगळे, कधी जथ्याने तर कधी दिंड्यायुक्त पालखीसोहळ्यारुपाने वारी करतात.

या लेखात भारतातील हिंदू धर्मातील वारकरी संप्रदायाचा त्यातही भागवत संप्रदायाचा परामर्ष घेण्याचा अल्प प्रयत्न आहे. महाराष्ट्रात वेगवेगळे धर्मसंप्रदाय त्यांच्या तत्वज्ञान, आचारधर्म, उपासनाप्रणाली इ. मुळे विभिन्न असले तरी जनसामान्यांचे प्रबोधन व अंतिम उदिष्ट परमार्थ हे त्यांचे मुख्य उद्देश्य त्यामुळे ते शतकानुशतके अनेक परकीय

आक्रमणातही धर्म व संस्कृती टिकवून अस्तित्वात राहिले याचे श्रेय त्या संप्रदायातील संत-आचार्य यांना आहे. विशेषतः हिंदू धर्म व संस्कृती यांची परंपरा या अग्निदिव्यातून तावून सुलाखून पार पडली व कसास उतरली ती या संत, आचार्य, महात्मे यांच्याच अथक प्रयत्न, परमनिष्ठा, परमश्रद्धा, परमसहिष्णुता, परमशुद्ध पवित्र आचरणानेच.

भारतात हिंदु धर्मसंप्रदायाचा विचार करता. १) शैव २) वैष्णव व ३) शाक्त ही तीन संप्रदायरुपे असून शैव पंथिय प्रभाव दक्षिण भारतात, वैष्णव-उत्तर व पश्चिम भारतात तर शाक्त -पूर्व भागात आसाम, बंगाल व ओडिशा येथे आहे. तरीही या सर्व संप्रदायांची विभागणी केवळ २ च भागात होते ती म्हणजे सगुण व निर्गुण. प्रामुख्याने वैष्ण संप्रदाय सगुण आहे तरीही काही या दोन्हीचा समन्वय करणारे आहेत. दत्त, गाणपत्य, नाथ, राम, कृष्ण, वेदान्ती इ. अनेक संप्रदाय उदय पावले व अस्तित्वात आहेत. वैष्णव / भागवत संप्रदाय हा प्रमुख गणला जातो त्यातही उपसंप्रदाय-महानुभाव, राधावल्लभ इ. आहेतच. यात निर्गुण भक्ती आचरण करणारा संप्रदाय वेदान्ती वैष्णव व उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, गीता ही आत्मज्ञानाची श्रेष्ठ साधने हे त्यांचे तत्त्व तर सगुण भक्ति संप्रदाय यात भक्तीमार्ग हा सगुण साकार ईशतत्व मानणारा आहे. नवविधाभक्तीस यात महत्वपूर्ण स्थान आहे.

शैव व शाक्त संप्रदायाचा प्रभाव वाढल्याने वैष्णव धर्मास लागलेली घसरण व्यासरचित भागवत पुराणाने नुसतीच थांबली नाही तर त्याद्वारे गीतातत्वज्ञानास पुष्टी मिळून वैष्णव संप्रदायाचा पाया भक्कम केला. यंत्र, मंत्र, तंत्र या तीन साधनांत देहकष्ट व बाह्य उपासनेची उणीव / अभाव यामुळे भक्तीसाधना व सगुणोपासना जी वैष्णव संप्रदायाची मुख्य तत्वे ती बहुजनसमाजास भावली व त्याचे रुपांतर भागवत धर्म / भागवत संप्रदायात झाले.

बौद्ध व जैन या धर्मांचा उदय व प्रसार यामुळे भागवत धर्मास लागलेली उतरती कळा वा ओहोट रामानुजाचार्य, मध्वाचार्य यामुळे थांबली. त्यांनी या दोन धर्मातील साधु, सम्राट, आचार्य व विद्वानांना वादात जिंकून भागवत धर्मध्वजा उंचावली. या सर्व प्रतिकूल परिस्थिती व अन्य धर्मआक्रमणांतूनही भागवत धर्म/संप्रदाय भरभक्कम उभा राहिला याचे कारण त्यास असणारी पूर्वपरंपरा/पूर्वपिठीका. अन्य धर्म वा संप्रदाय उदयास येण्याआधीच हजारो वर्षे हा भागवत/वासुदेव संप्रदाय निर्माण झाला होता व अनेक तपस्वी मुनी, ऋषी, आचार्य व राजे/सम्राट यांनी त्यास भक्कम आधार देवून तो अक्षय ठेवला.

यास थोडीशी अवकळा ११ व्या (अकराव्या) शतकात लागली होती पण ती फार मोठी  लक्षणीय अशी मुळीच नव्हती. ''यदा यदा ही धर्मस्य... संभवामी युगे युगे।।'' या भगवद्गीतेतील वचनाप्रमाणे भगवंताने अशा परिस्थितीचा उद्भव झाल्यावर अंशावतार वा स्वतः पूर्णावतार होवून धर्मरक्षण वा धर्मध्वजा उन्नत केली आहे व तसे करण्याचे त्यांचे हे वचन त्रिकालाबाधित आहे. त्यामुळे त्यांनी

या वेळीही हे कार्य केले. भक्तश्रेष्ठ पुंडलीकाचे घरी भगवान श्रीकृष्ण स्वतः विठ्ठलरुपात पंढरपूरात त्याचे घरी प्रगटले व तो मातापित्याचे सेवेत मग्न असल्याने त्याने दिलेल्या विटेवर उभे राहिले युगानयुगे. असे सांगतात की भगवान विठ्ठल कायम येथेच राहावेत म्हणून भक्त पुंडलीकाने स्नान करून येईतो थांबा असे सांगून नदीत आत्मसमर्पण केले व तो परत आलाच नाही. परिणामी विठ्ठल भगवान युगानयुगे त्या विटेवरच उभे आहेत. या आख्यायिकेचे सत्यासत्यतेत न जाता एवढे स्पष्ट म्हणता येईल, भक्तवत्सल श्रीविठ्ठल भक्तावर प्रसन्न होवून त्याचे इच्छेप्रमाणे पंढरपूरात अक्षय वास करून आहेत व कायमच राहणार आहेत. अठ्ठावीस युगानंतरही ते उभे आहेतच. यासंबंधी काही शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत.

भक्त पुंडलीक हाच वारकरी संप्रदाय प्रवर्तक आहे व वारकरी संप्रदाय तसेच मानतो. त्यावेळचे होयसळ यादव घराण्यातील विष्णुवर्धन राजास भगवान विष्णू प्रगट झाल्याचे वृत्त कळताच त्याने पंढरपूर (त्यावेळचे पांडुरंगपूर) येथे विठ्ठलमंदीर उभारले व हे विठ्ठलरुप वैष्णवांना अत्यंत प्रिय, जीव की प्राण झाले. भक्त पुंडलीकाने आषाढ शुद्ध एकादशी ही तिथी निश्चित केली. त्यामुळे एकादशी हा दिवस या संप्रदायात अत्यंत पवित्र मानला जातो. हा त्यांचा व्रत दिवस होय.

चौऱ्यांशीचा शिलालेख शके ११९५ मध्ये पांडुरंग/विठ्ठल मंदिराचा उल्लेख आहे. तसेच १२३७ शके मधील संस्कृत व कानडी भाषेतील विठ्ठलमंदिरातील तुळईवरील लेखात ''पुंडरिकमुनी'' हा उल्लेख आहे. श्री आद्य शंकराचार्य यांच्या पांडुरंगाष्टकातही ''महायोगपीठे तटे भीमरश्चाम्। वरं पुंडरिकाय दातुं मुनीन्दैः।। समागत्य तिष्ठन्तमानंदकंदं। परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम्।।'' असा श्लोक असून त्यात पुंडलीकास वर देण्यासाठी पांडुरंग पंढरीस आल्याचे सांगितले आहे.

श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे पूर्वीही अनेकजण विठ्ठल भक्त होते. पांडुरंगमंदिरात पूजाअर्चाही होत असे. एकादशीव्रत प्रचलीत होते. अनेक गावाहून भक्त पंढरपूरास नित्यनेमाने येत म्हणजेच वारी करीत यावरुन वारकरी संप्रदायाचा मूळ प्रवर्तक ''पुंडलीक''च होता हे सिद्ध होते.

जे आषाढी व कार्तिक शुद्ध एकादशीस पंढरपूरास व वद्य एकादशीस आळंदीस नियमितपणे जातात त्यांना ''वारकरी'' म्हणतात. पुष्कळ वारकरी प्रत्येक महिन्याचे शुद्ध ११ ला पंढरपूर व वद्य ११ ला आळंदीस जातात. त्यामुळे या संप्रदायास ''वारकरी संप्रदाय'' संबोधिले जाते. हे वारकरी गळ्यात नेहमी तुळशीची माळ घालतात. त्यामुळे त्या संप्रदायास ''माळकरी संप्रदाय'' असेही म्हणतात. भगवंतास सर्वस्व अर्पण करणारा तो भक्त अशी भक्ती याच पंथात सांगितली आहे. म्हणून त्यास ''भागवत संप्रदाय'' असेही संबोधन आहे.

वारकरी संप्रदाय ज्ञानेश्वरी, एकनाथी

भागवत व तुकारामाची गाथा हे प्रमुख ग्रंथ मानतो. त्यात ज्ञानेश्वरी सर्वश्रेष्ठ कारण याच ग्रंथातील वारकरी संप्रदाय तत्वज्ञान अन्य दोन ग्रंथात महणजे एकनाथी भागवत व तुकाराम गाथा यात विस्ताराने आहे. या संप्रदायाचे संपूर्ण तत्वज्ञान श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या ''अमृतानुभव'' व ''हरिपाठ'' तसेच ''चांगदेव पासष्टी'' यात आहे. या वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान सार संक्षेपाने ज्या प्रमुख पांच भागात विभागले गेले आहे ते पांच भाग -

१) परमात्मा/परब्रह्म २) विश्व/जगत ३) जीव ४) माया व ५) मुक्ती/मोक्ष.

या संप्रदायाचे एक वैशिष्ट्य म्हणजे यातील दोन संत श्रीज्ञानेश्वर व एकनाथ ज्यांनी याचा प्रचार केला, प्रसार केला त्यांचा गुरुउपदेश वा गुरुपरंपरा अन्य संप्रदायातील होती. श्री. ज्ञानेश्वर माऊलींची गुरुपरंपरा ही नाथ संप्रदायातील तर एकनाथांची दत्तसंप्रदायातील तरी पण हे दोघे महान विठ्ठल भक्त होते.

वारकरी संप्रदायात श्रीराम व श्रीकृष्ण ही दैवते समाविष्ट आहेत कारण दोन्हीही श्रीविष्णूंचेच अवतार आहेत. वारकरी संप्रदाय तत्वज्ञानात १) परमात्मा/परब्रह्म हे सनातन व स्वयंप्रकाशी, स्वयंसिद्ध व सत्‌चित् व आनंदरुप आहे. ते स्वयंतेजोमयी ज्ञानस्वरुप आहे. ते ना सगुण ना निर्गुण. हे शिव व शक्तीचे एकत्रिकरण असून दोन्हीमध्ये अद्वैत आहे. ज्ञानेश्वरीत ''ॐनमोजी आद्या'' ही प्रारंभ ओवी तसेच त्यांचे ''अमृतानुभव'' मधील ''ऐशी इथे निरुपाधिके। जगाची जिये जनके। ती वंदिली प्रिया मुळिके देवोदेवी।।'' ही ओवी व ''तुज सगुण म्हणू की निर्गुण रे। ... एक गोविंदु रे।।'' हा अभंग इ.तून परब्रह्मतत्त्व सांगितले आहे.

२) जगत/विश्व - या संबंधी ते परमेश्वराची लीला व स्फूर्ती आहे असे समजतात. अमृतानुभावातील ७-२९१ मधील ओवी ''यालागी वस्तुप्रभा । वस्तुची पावे शोभा । जात असे लाभ । वस्तुचिथा ।।'' हेच सांगते. श्रीज्ञानेश्वर माऊली हे स्पष्ट करते की परमात्मा जगतरुपाने स्वतःशीच खेळत असतो म्हणून जगत् हे मायारुप नाही तर चिद्विलासरुप आहे आणि हाच माऊलीचा आवडता सिद्धांत आहे. नामरुपात्मक जगत्‌मिषाने एक ब्रह्मवस्तूच प्रकाशली आहे. तत्वतः जगत् काही नसून स्वयंप्रकाशाने ब्रह्मवस्तूच शोभायमान झाली आहे.

३) जीव - तिसरा घटक जीव जा परमात्म्याचा अंश आहे पण कर्मामुळेच त्याला जीवदशाप्राप्त झाली आहे.

४) माया - चौथा घटक जिच्यामुळे जीव बद्ध होतो. ही दोन प्रकारची म्हणजे विद्यामाया व अविद्या माया असून अविद्यामाया परमार्थप्राप्तीस बाधक आहे तर विद्यामाया परमार्थप्राप्तीस साधक/सहायक आहे. ही माया नदी केवळ महाभयंकर असून अनन्यभावे सर्वसमर्पण करुन भगवंत / परब्रह्मास शरण जाणारच ती पार करु शकतो. ज्ञानेश्वरीतील ७ वा अध्याय यावरच आहे.

५) मोक्ष - हा पाचवा घटक. मोक्ष हे

जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. जीवा-शिवाचे ऐक्य साधणे, परब्रह्मात एकरुप होणे म्हणजेच मोक्ष. वारकरी संप्रदायात नवविधाभक्तीप्रकारात नामस्मरण / नामसंकीर्तन हे मोक्षप्राप्तीचे अमोघ साधन मानले जाते व त्यासाठी सत्संगतीलाही फार महत्व आहे. स्वतः श्रीविठ्ठलांनीच विठ्ठल हृदय स्तोत्रात स्पष्टपणे सांगितले आहे की ''ॐकारो ऽ नाहतो मूर्तिराहतो नामसंकीर्तनम्''

हरिपाठात सुद्धा हेच नाममहात्म्य वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतील अ. ९ ओवी २०८ हेच सांगते. वारकरी संप्रदाय संतसंगतीस मोक्षाचे साधन मानतात. ''संत हेच भूमीवर। चालते बोलते परमेश्वर । वैराग्याचे सागर । दाते मोक्षपदाचे ।।'' ''संत हेच सन्निती़ची । मूर्ती होय प्रत्यक्ष साची । संत भव्य कल्याणाची । पेठ आहे विबुध हो ।।'' असे संतकवी श्री दासगणूंनी ''गजाननविजय'' या पोथीत लिहिले आहे. ज्ञानेश्वरीत अध्याय १८, ओवी १३५६ मध्ये माऊली सांगते'' आत्मज्ञाने चोखडी । संत जे माझा रुपडी। तेथ दृष्टी पडो आवडी। कामिनी जैशी।।'' तसेच त्याच अध्याय १८ त ओवी क्र. १६३१ मध्ये ''चंद्र तेथे चंद्रिका । शंभू तेथे अंबिका। संत तेथे विवेका। असणे की जी ।।'' अशी संतांची प्रशस्ती व गुण वर्णिला आहे. हरिपाठातही सत्संगमहिमा. ''साधुबोध झाला, नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभवे।।'' या ओवीत तसेच आणखी एका ओवीत ''संतांचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे पंथे।।'' याप्रमाणे दिला आहे. तेव्हा सतसंगतीला वारकरी संप्रदायात फार मान आहे. संतसंगतीनेच भक्ती स्थिर होते. भक्तीचा सहजसोपा मार्ग सापडतो व अंती भगवत प्राप्ती होते यावर वारकरी संप्रदायाची दृढ श्रद्धा आहे.

वारकरी संप्रदायाचीही विशिष्ट आचारसंहिता व विशिष्ट उपासना / साधना आहे. प्रत्येक संप्रदायाची ओळख त्याचे आचारसंहिता व साधनाप्रणाली यामुळे असते. नाथसंप्रदाय नाथपंथिय वेशभूषा योगसाधना यामुळे तर दत्तसंप्रदाय त्यांचा आचारधर्म, साधना, पारायण ग्रंथ, व्रते इ. मुळे, शैवपंथीय त्रिशूल शस्त्रधारण, रुद्राक्षमाळा, आडवे भस्मपट्टे इ. व शिवप्रदोषादि सोळा सोमवारा दि व्रते, ॐ नमः शिवाय नामजप इ. मुळे सहज ओळखू येतो, त्याचप्रमाणे वारकरी संप्रदायाची वैशिष्ट्ये येणेप्रमाणे :-

अ) उपास्य दैवत - १ श्रीविठ्ठल :- वारकऱ्यांच्या संप्रदायाचे व्यापक तत्वज्ञानाचे हे अराध्य दैवत. विष्णु, कृष्ण, राम, विठ्ठल यांचा निर्विवाद ऐक्यसंबंध संप्रदायात लोकमान्य आहे. भगवान श्रीविष्णुचे २४ अवतार व दशावतार आहेत. त्यात विठ्ठलाचा उल्लेख नाही. हा शुद्धसत्व विठ्ठल विष्णुसहस्त्रनामाहून वेगळा आहे. तो भक्तसखाही आहे तसाच तो दिनाचा दयाळू, भक्तवत्सल, दयार्णव, कृपाळु, भक्तकामकल्पद्रुम आहे. स्वतः निवृत्तीनाथांनीच सांगितले आहे की नंदाघरी नांदणारा कृष्णच विठ्ठलरुपात आला व वीटेवर उभा राहिला. भक्तांसाठी तो तसाच सतत युगानयुगे उभाच आहे. श्रीकृष्ण जन्म श्रावण वद्य अष्टमीस रोहिणी नक्षत्रावर

मध्यरात्री बुधवारी झाला म्हणुन विठ्ठलभक्त हे, बुधवार हा विठ्ठलाचा वार मानतात व कधीही बुधवारी पंढरपुरातून परतत नाहीत. विष्णुशी संबंधीत एकादशी व्रत ते निष्ठेने करतात व विष्णुप्रिय तुळस त्यांना अत्यंत प्रिय असते. पंढरपूर मंदिरातील शिलालेखात पंढरपूरचा पांडुरंगपूर व विठ्ठलाचा विठ्ठलदेव असा उल्लेख आहे. येथील विष्णुपदाला ''वेणुनाद'' असे दुसरे नाव आहे. याठिकाणीच श्रीकृष्ण व संगमदैत्यांचे युद्धात संगम दैत्य शिळेखाली दडून बसला त्या शिळेवर पाय ठेवून श्रीकृष्णाने वेणू वाजावायला सुरवात केली. त्या श्रीकृष्ण भगवानांचा पाय म्हणजेच ''विष्णुपद' होय.

विठ्ठलमूर्तीचे रुप मनोहारी आहे. डोक्यावर उंच टोपी सारखा मुकुट यालाच शिवलींग म्हणतात. कानात माशाचे आकाराची मकराकार कुंडले, उभट मुख, फुगीर गाल, गळ्यात कौस्तुभमणीहार, उजव्या छातीवर खळगी व वर्तुळखंड असून त्याला श्रीवत्सलांछन व श्रीनिकेतन अशी नावे आहेत. दंडावर व मनगटावर दुहेरी बाजुबंद व मणीबंद. कमरेवर हात ठेवलेले व त्याच अवस्थेत उजव्या हातात कमळदेव. कमरेला तीन पदरी मेखला. कमरेला वस्त्र व त्याचा सोगा पावलापर्यंत लांब आहे.

२) विठ्ठल मंदीरे – पंढरपूर, सोलापूर, अहमदनगर इ. अनेक ठिकाणी महाराष्ट्रात तसेच आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू इ. प्रांतातही आहेत.

३) विठ्ठलावरील ग्रंथसंपदा – अनेक दुर्मिळ ग्रंथ आता उपलब्ध नाहीत – विठ्ठलगीता, विठ्ठलगीतासारस्तोत्र, विठ्ठल पंचरत्न, श्रीविठ्ठलस्तवराज, श्रीमद्‌विठ्ठलहृदयस्तोत्र, विठ्ठलाष्टक, श्रीविठ्ठलस्तोत्रम, पांडुरंगाष्टकम्, विठ्ठलअष्टोत्तरशतनामस्तोत्रम, विठ्ठलभूषण, विठ्ठलसहस्त्रनाम, श्रीविठ्ठलरूढ–मंत्रसारभाष्य इ. श्रीस्कंद, पद्मपुराण व विष्णुपुराणात ''पांडुरंगमाहात्म्य'' पोथीचा उल्लेख आहे.

४) मंत्रा – ''रामकृष्ण हरि'' हा प्रामुख्याने म्हणतात.

इतर विठ्ठल मंत्र असे :– ''विठ्ठलाय नमः'', ॐ विठ्ठलाय नमः'' श्रीकृष्णाय नमः''. हे तीन विठ्ठल मंत्र म्हणतांना / जपानुष्ठान करतांना ''ॐ अस्य श्रीपांडुरंगमंत्रस्य पुंडरिक ऋषिः श्री विठ्ठलो देवता, श्रीविठ्ठलप्रीत्यर्थे चतुर्विधपुरुषार्थसिद्ध्यर्थे जपे विनियोगः ।।

असा संकल्प प्रथम म्हणतात.

५) सांप्रदायिक वेशभूषा – गळ्यात तुळशी माळ, गोपिचंदनादि मुद्रा, हातात भगवी पताका, उभे गंध कपाळी, हाती टाळ/वीणा/मृदुंग. ''कुंचे पताका झळकती । टाळ, मृदुंग वाजती ।। आनंदे प्रेमे गर्जती । भद्रजाती विठ्ठलाचे ।।'' असा संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग आहे. तसेच संत तुकारामही ''गोपी चंदन उटी, तुळशीच्या माळा । हार मिरवती गळा रे । टाळमृदुंग घाई पुष्पांचा वरुषाव । अनुपम्य सुख सोहळा रे ।। असे वर्णन करतात.

६) मुख्य कार्यक्रम – पंढरपुरात वारकऱ्यांचे दोन महत्वाचे कार्यक्रम असतात. १) चंद्रभागेत

स्नान व २) विठ्ठल दर्शन.

७) नीतिनियम - सत्य वदणे, परस्त्रीस मातेसमान मानणे, नियमित वारी - पंढरी व आळंदीस, भिक्षापत्र न अवलंबिणे, अन्नदान - गोरगरीबांना, गरजूंना शक्य ती सर्व मदत - आर्थिक वा अन्यप्रकारची, निरपेक्षपणे कुवतीनुसार करणे, नामस्मरण, नित्य हरिपाठ (हरिपाठ ही वारकऱ्यांची संध्याच असे समजतात), तसेच नामसंकीर्तन, ज्ञानेश्वरी पारायण वा नित्थवाचन इ. याशिवाय प्रत्येक दिंडीचे वेगवेगळे आचारसंहितेचे नियम असतात व ज्या दिंडीत सहभाग असतो त्या दिंडीचे आचारसंहितेचे पालन करणे हे ही येतेच.

वारकरी संप्रदायास दैदिप्यमान स्वरुप प्राप्त झाले ते ज्ञानेश्वर माऊलींमुळे. तुकाराम, नामदेव, एकनाथ यांचे काळात वारकरी संप्रदायाचा विकास चरणसीमेस पोहोचला व त्या संप्रदायाचे धार्मिक व सामाजिक कार्य आजही जोमात सुरु आहे. हरिपाठ, ज्ञानेश्वरी, चांगदेवपासष्टी, अमृतानुभव, तुकाराम गाथा, नामदेवाचे अभंग, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, भारुडे इ. संतसाहित्यास या संप्रदायात अत्यंत श्रेष्ठ व आदराचे स्थान आहे, तसेच सोपानदेव, मुक्ताई, निवृत्तीनाथ यांचे साहित्यासही आहे.

वारकरी संप्रदायासबंधी जिज्ञासूंनी ''वारकरी संप्रदाय - उदय व विकास'' हा श्री. भ.प. बहिरट यांचा ग्रंथ वाचावा अधिक विस्तृत माहितीसाठी.

अर्वाचिन काळातही या संप्रदायाची उज्ज्वल वाटचाल सुरु आहे. ती धुरा पावसचे स्वरुपानंद, गुलाबराव महाराज, विष्णुबुवा जोग, देगलूरकर-धुंडामहाराज, साखरे, सोनोपंत दांडेकर, केशवराव देशमुख इ. अनेक दिग्गजांनी वाहिली. या संप्रदायातही काही वादविवाद उत्पन्न झाले पण टिकले नाहीत.

भारदे-भिंगारकर वाद-ज्ञानेश्वर एक की दोन, ज्ञानेश्वरांचे समाधीस भोक पाडून आत कॅमेरा सोडून फोटो काढणे इ.

वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य व योगदान फार मोठे आहे. ते येणेप्रमाणे :

१) यात सर्व जाती, धर्म, वंश, लिंग यांचा कोणताही भेदभाव न पाळता सर्वांनाच मुक्त प्रवेश. सामाजिक समता या पंथात आहे. धार्मिक, आर्थिक विषमता / भेदभाव येथे नाही.

२) मोक्ष हा सर्वासाठी आहे. भक्तीमार्ग अवलंबून कोणीही मोक्षसाधन करु शकतो. स्त्री-पुरुष, चांडाळ-शुद्र इ. कोणताही भेदभाव नाही. सर्व जाती धर्म लिंग वंशाचे लोकांना हा अधिकार आहे.

३) याच संप्रदायात सर्व जातीत संत झाले आहेत. गोराकुंभार, नामदेव शिंपी, चोखा महार, नरहरी सोनार, रोहीदास-चांभार, सावता माळी, विसोबा खेचर-ब्राह्मण, सेना न्हावी तसेच बहिणाबाई, जनाई, मुक्ताई इ. स्त्रियाही. ईश्वरास जातीधर्माचे वावडे तर नाहीच पण तो सर्वाभूती आहे हे या संप्रदायाचे वैशिष्ट्य. ईश्वरास सर्व लोक समान आहेत.

४) या संप्रदायातील सर्व ग्रंथ मराठी / प्राकृतात आहेत. संस्कृत भाषेतील ज्ञानभंडार हे सर्व सामान्य जनतेस मिळणे अशक्य होते ते सर्व ज्ञानभांडार या संप्रदायातील लोकांनी जनसामान्यांसाठी मराठीत आणून जनप्रबोधन केले. ज्ञानाचे दरवाजे सर्वांना खुले केले.

५) जनसामान्यांना सुलभ भक्तीमार्ग दाखविला. अंधश्रद्धा व अंधविश्वासाचा जनमानसावरील पगडा नष्ट केला व मंत्र-तत्र, जारण मारण, जादुटोणा, नवससायास या मार्गांचे फोलपण पटवून देवून तो प्रभाव नष्ट केला.

६) या संप्रदायात कोणतीहि तांत्रिक साधना नाही, ना नवससायास, ना अभिषेकादि पूजोपचारप्रस्थ, गंडे, दोरे, माळा, ताईत इ. ना स्थान नाही. केवळ शुद्धाचरण व नामस्मरण नामसंकीर्तन. कसलेही आसन, प्राणायाम, मुद्रा, त्राटक इ. प्रकार नाहीत.

७) सहिष्णुता, अहिंसा, परोपकार, सत्याचरण, दया, क्षमा, लीनता, सत्संग, त्याग, सद्‌गुरुनिष्ठा भक्ती व उच्च आचारविचार, एकरुपता हीच वारकरी संप्रदायाची ओळख

८) मानवता हाच खरा धर्म ही प्रमुख शिकवण

या वारकरी संप्रदायाने फार मोठी समाजपरिवर्तनाची, समाजपुरुषप्रकृती निरोगी ठेवण्याची व सामाजिक अभिसरणाची, भक्तीमार्ग दाखवून ज्ञानभांडारे सर्वांना मुक्त करण्याची महान कामगिरी केली व ती प्रक्रिया आजही सुरुच आहे.

या वारकरी संप्रदायात काळाच्या ओघात काही अपप्रवृत्ती शिरल्या आहेत कारण काही स्वार्थी, दंभाचारी, लालची, प्रसिद्धी व भपक्याची आवड असणारे व वरपांगी सोज्ज्वळ प्रवृत्त्चा बुरखा / मुखवटा घालणारे, अनभवशून्यज्ञानी लोक यात घुसून स्वतःची झोळी भरण्याचे काम करु लागले आहेत व भोळ्या भाविक निर्व्याज्य, भावभक्तीत रंगलेल्या, निरागस, निर्लोभी, निरहंकारी वारकऱ्यांना भुरळ घालून त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा त्यांना मोहात पाडून उचलत आहेत. यांचे अंगी ना वारकऱ्यांचे गुण, ना श्रद्धा, ना निष्ठा, ना त्याग, ना संतांची साधी रहाणी व उच्चिविचारसरणी हे वारकरी संप्रदायास लागलेले बिरुड आहे. ग्रहण आहे वा हळूहळू पसरणारे विष आहे, ही वाळवी आहे भागवत संप्रदाय वृक्षास लागलेली. सोन्याच्या पादुका, चांदीचे रथ, चांदीची छत्रचामरे, सोन्याच्या पत्र्यावर ग्रंथ लेखन, संतांची नाणी, तिकीटे, प्रसाद पाकीटे, मंदिराला चांदीचे पत्रे बसविणे, घाटांच्या तथाकथित सुधारणा, भेट/शुभेच्छा पत्रे, ऐश्वर्यवती ग्रंथ/पोथी छापणे, अभंगांच्या कॅसेटस्, ध्वनीमुद्रिका व्हिडीओ इ. ची चलती, मंदिरावर हेलीकॉप्टरने पुष्पवृष्टी, व्ही आय पी दर्शनबारी, दर्शनास मूल्य इ. अनेक अपप्रवृत्ती बोकाळत चालल्या आहेत. अभिषेकासाठी पावती पुस्तके छापून कितीतरी लुच्चे पैसे गोळा करत असतात. महासोहळे जन्माचे व पुण्यतिथी / समाधीचे आयोजन करुन धनार्जनासारख्या महाघातक प्रथा चांगल्याच रुजू लागल्या आहेत. सेवाभावाचे नावाखाली एक फसवणूकीचा धनार्जनाचा मार्ग या दांभिक तत्वशून्य अपप्रवृत्तीच्या लोकांनी चोखाळून संप्रदायास कलंकीत केलेले आहे.

विश्वस्तांचे कारभारही स्वच्छ नाहीत. विश्वस्तांच्या नेमणूका हाही एक वादविषय राजकारण असलेला.

हे सर्व नष्ट होवून वारकरी संप्रदायाची प्रतिमा सोज्ज्वळ, मनोहारी, सेवाधर्मी, मानवतावादी, सहिष्णु व निष्कलंक ठेवण्याचे आणि संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव इ. संतांचे विचार आचार, शिकवण खऱ्या अर्थाने समाजापुढे ठेवण्याचे महान कार्य या संप्रदायातील निष्ठावंत वारकरी संप्रदाय नेत्यांनी करावयाचे आहे. प्रश्न आहे की हे शिवधनुष्य ते उचलणार का याचा? उत्तर अर्थात काळाच्याच उदरात – कालाय तस्मै नमः।

असा हा वारकरी संप्रदायाचा अल्पमतीने घेतलेला आढावा. त्यात त्रुटी असतील तर ते माझे नेणतेपण, ते दाखवून दिल्यास आभारी होईन. ''न्यून ते भरते, अधिक ते सरते'' करुन घ्यावे या विनंतीने लेख समाप्त करुन तो वारकरी संप्रदायास अर्पण करतो. ''जय जय रामकृष्ण हरी'', ''पुंडलिक वरदा हरि विठ्ठल,''–श्री ज्ञानदेव तुकाराम'' ''पंढरीनाथ महाराज की जय''.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

•••

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

पर्यंत म्हातारपण दूरवर आहे, जोपर्यंत इन्द्रियांची शक्ती क्षीण झालेली नाही व जोपर्यंत आयुष्याचा क्षय झालेला नाही तोपर्यंत शहाण्या माणसाने स्वतःची उन्नती करण्यासाठी झटावे. तहान लागल्यावर विहीर खणणे कितपत शहाणपणाचे आहे?

**जलतुम्बिकान्यायने रेफस्याध्र्वगमनम्।**[३६८]

ज्याप्रमाणे पाण्यात पडलेला शुष्क भोपळा पाण्यावर तरंगतो (जलतुम्बिका न्याय) त्याप्रमाणे रफार हा पुढील अक्षराच्या डोक्यावर जातो. उदा. पूर्व–पूर व रफार व ह्या व्यंजनाच्या डोक्यावर गेला. रफार पुढचे व्यंजन स्वरसहित मात्र हवे. मग ते व्यंजन रफारापासून लांब असले तरी उदा मूर चछना=मूर्च्छना र् पासून छ हे व्यंजन लांब आहे पण ते स्वरसहित आहे.

**तुम्बिका–तृण–काष्ठं च तैलं जलम् उपागतम्।**
**स्वभावात् उर्ध्वम् आयाति रेफस्य एतादृशी गतिः।।**

शुष्कभोपळा, गवत, सुके लाकूड, तेल हे जर पाण्यावर पडले तर त्यांची वर जाण्याची नैसर्गिक वृत्ती असते. त्या प्रमाणेच रफार याची वृत्ती स्वरयुक्त व्यंजनावर जाण्याची आहे. क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

सर्व चराचरात परमेश्वरच (परमात्मा) अंशरुपाने (अदृश्य रुपात) भरला आहे, या अर्थाची 'मया ततमिंद सर्वं जगदव्यक्तमूर्तिना', सर्वभूतस्थमात्मान' वगैरे बरीच वचने गीतेत निरनिराळ्या अध्यायांत आली आहेत. वेदविद्येतील हे एक मूलतत्त्व आहे. मनुष्यालाही ते तत्त्व लागू आहे. परंतु मनुष्याला परमात्म्याने इतर प्राण्यांच्या तुलनेत, प्राणशक्तीबरोबर कल्पना करू शकणारे संवेदनशील 'मन', विचार करु शकणारी 'बुद्धि' आणि विचार शब्दरुपात प्रकट करु शकणारी 'वाणी' या तीन गोष्टी अधिक दिल्या आहेत. 'निहितं गुहायाम्' असलेला मनुष्याच्या अंतरातील 'आत्मा' स्वतः काहीच करीत नाही, तरी सुद्धा पचन, श्वसनादी शरीरांतर्गत क्रिया, इन्द्रिये-मन-बुद्धी व कर्मेंद्रयांच्या क्रिया या आत्म्याच्याच सत्तने चालत असतात. त्यासाठी आत्मा, अन्न, प्राण, मन, बुद्धी वगैरे निरनिराळी रुपे घेऊन त्या सर्व क्रियांचे संचलन करीत असतो. तरी मूळ आत्मरुपांत मात्र तो काहीच करीत नाही असे वैदिक तत्त्वज्ञान सांगते.

तैत्तिरीयोपनिषदात आत्मतत्त्व (ब्रह्माचा अंश) माणसाच्या जड देहात, निरनिराळ्या चार रुपात देहाला कसे व्यापून राहते ते दाखविले आहे. आपल्या जड शरीरातील इन्द्रियांचे आणि जगण्याला आवश्यक अशा पचन श्वसनादिक संस्थांचे कार्य चालवण्याचे काम मूळ आत्मतत्त्व त्याच्या प्राणरुपाने सर्व शरीर व्यापून करत असते. सर्व शरीर व्यापून असल्यामुळे त्याने शरीराचाच आकार घेतला आहे असे उपनिषद् सांगते. म्हणून त्याचा उल्लेख प्राणमय शरीर असा केला आहे. हे प्राणमय शरीर सर्व जीवांच्या जड शरीरात असणे आवश्यक आहे. मानवाला परमेश्वराने वर म्हटल्याप्रमाणे इतर प्राण्यांच्या तुलनेत, मन बुद्धी आणि अहंकार (वाणी) यांची देणगी दिली आहे. त्यामुळे या मनाचे सर्व व्यापार चालविणारी शक्ती, आत्म्याच्या मनोमय रुपाने सर्व मानवी शरीर व्यापून असते. कुत्रा, घोडा, हत्ती यासारख्या माणसाळलेल्या प्रगत पशूंमध्येही ही मनःशक्ती काही प्रमाणात विकसित झालेली दिसते. मनावर नियंत्रण करणारी मनापेक्षाही श्रेष्ठ अशी बुद्धीही परमेश्वराने माणसाला बहाल केली आहे. बुद्धीमुळे मनुष्य वैज्ञानिक पद्धतीने विचार करू शकतो म्हणून या उपनिषदात बुद्धीऐवजी विज्ञान शब्द वापरला आहे. बुद्धी ही मनोमय शरीराचा आत्माच आहे. या बुद्धीमय रुपातही आत्मतत्त्व सर्व मनोमय शरीर व्यापून असते. म्हणून मनोमय शरीराच्या अंतर्गत हे विज्ञानमय शरीर व्यापून असते आणि शेवटी या बुद्धीमय शरीराचाही जो आत्मा असा जो 'निर्मळ आनंद' त्याच्या रुपात ते आत्मतत्त्व प्राणमय, मनोमय आणि विज्ञानमय अशा तीन पदरांचे आवरण घेऊन हृदयांतरीच्या गुहेत बसत असते असा तैत्तिरीयोपनिषदाचा सिद्धांत आहे.

योगसाधनेने किंवा अन्य उपासना मार्गानेच मनुष्य हे तीनही पदर पार करून त्या आनंदस्वरुप ब्रह्मतत्त्वाला पोहोचू शकतो असा या उपनिषदाचा सिद्धांत आहे.

परमात्मा अंश रुपाने सर्वांच्या अंतरात अदृश्य रुपात वसत असतो हे सत्य आहे. पण तो केवळ साक्षी रुपातच वसत असतो. सामान्य माणसाच्या अंतरात तो केवळ उदासीन वृत्तीने माणसाचे आचार आणि विचार पाहात असतो व CC कॅमेराप्रमाणे त्यांची नोंद करून चित्रगुप्ताच्या 'Main Frame' मध्ये पाठवत असतो. मनुष्य आपल्या बुद्धीप्रमाणे हवे ते कर्म करण्यास स्वतंत्र असतो. आत्मा ते सर्व केवळ साक्षीरुपाने पाहात असतो. सामान्य माणसाच्या आचारकर्मात त्या आत्म्याचा कोणताच हातभार नसतो. सर्व सामान्य माणसांच्या अंतरातील आत्मा हा प्रथम केवळ साक्षीरुपात कार्य करीत असतो. परंतु माणसाला अध्यात्म्याची जिज्ञासा निर्माण झाली, ईश्वर भेटीची तळमळ लागली, त्याची साधनेत व उपासनेत प्रगती होऊ लागली की, त्याची देवाशी जवळीक वाढत जाते. त्याप्रमाणे हृदयस्थ ईश्वर (आत्मा) मूळात असलेली केवळ (उपद्रष्ट्याची) साक्षी भावाची भूमिका क्रमाक्रमाने कशी बदलत जाते हे गीतेच्या १३ व्या अध्यायातील २२ व्या श्लोकात सांगितले आहे. तो श्लोक असा -

**उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः। परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन् पुरुषः परः।।२२।।**

मराठीत अनुवाद

सर्वसाक्षी अनुमन्ता भर्ता भोक्ता महेश्वर। म्हणती परमात्मा त्या देहीं जो या असे स्थित।।

या श्लोकाचे शब्दशः गद्यात भाषांतर असे आहे. 'सर्व लोकांच्या देहांत वास करून उपद्रष्टा, अनुमन्ता, भर्ता, भोक्ता आणि महेश्वर वगैरे भूमिका वठवणारा परमेश्वर म्हणजेच परमात्मा होय.'

उपद्रष्टा हा शब्द उप-पश्यति या धातूपासून बनला आहे. 'उपपश्यति' या संस्कृत धातूच्या अर्थांच्या तीन छटा आहेत. १) केवळ साक्षीभावाने पहाणे, २) देखरेख करणे (Supervision), आणि ३) स्वप्न पहाणे (भविष्याबद्दल आशा बाळगणे). जो मनुष्य नास्तिक आहे, किंवा अज्ञानामुळे ज्याला ईश्वराच्या अस्तित्वाची जाण नाही, अशा माणसाच्या बाबतीत परमेश्वर केवळ (१ल्या अर्थाच्या) उपद्रष्ट्याची भूमिका घेत असतो. म्हणजे अगदी अलिप्तपणे केवळ 'साक्षी'ची भूमिका घेऊन तो त्याच्या कर्मांची केवळ नोंद ठेवत असतो. परंतु जो आस्तिक असून ज्याला ईश्वराच्या अस्तित्वाची जाणिव आहे व जो त्याच्या उपासनेला लागला आहे, अशा माणसाच्या बाबतीत देव उपद्रष्ट्याचीच पत्र क्र.२ची भूमिका घेतो, जसे एखादी दाई मुलाला पाहाते. मूल सामान्यपणे खेळत असते तेव्हा दाई त्याच्याकडे केवळ साक्षीभावानेच पहात असते, परंतु जर मुलाने नको ती वस्तू वा माती तोंडात घातली किंवा जर ते पडावयास

लागले तरच ती दाई धावत जाऊन त्याला तसे करण्यापासून परावृत्त करते. त्याप्रमाणेच भक्ताकडे ईश्वर साक्षीभावानेच पहात असतो, पण जर भक्ताच्या मनात वाईट (विचार) विकार उत्पन्न होऊन तो दुष्कर्म करण्यास प्रवृत्त आला, तर ईश्वर त्याच्या मनात विवेक उत्पन्न करून त्याला दुष्कर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. पुढे भक्ताच्या मनात भक्ती चांगली दृढ झाली व त्याची साधनेत थोडीफार प्रगती झाली, की मग देव उपद्रष्ट्याचीच पण ३ऱ्या क्र.ची भूमिका घेऊ लागतो. देव भक्ताच्या (भविष्यात) आणखी प्रगतीविषयी स्वप्न पाहू लागतो व त्याची उपासनेवरची श्रद्धा दृढ करून त्याच्या मनात साधनेविषयी गोडी निर्माण करतो.

साधना आणखी प्रगत झाली, नामात प्रेम उत्पन्न झाले, व ते मुखातून निष्काम येऊ लागले की भक्ताचे 'ईश्वराशी', अगदी प्राथमिक स्वरुपाचे का होईना, 'अनुसंधान' साधू लागते, व त्यानंतर परमेश्वर उपद्रष्ट्याच्या पुढील म्हणजे अनुमन्त्याची भूमिका घेऊ लागतो. भक्ताचा साधनेविषयी किंवा प्रापंचिक व्यवहाराविषयी काही चांगला निर्णय झाला, तर त्याला ईश्वर, आतल्या आवाजाच्या माध्यमातून त्या निर्णयाला अनुमोदन देतो, व त्याचा आत्मविश्वास व उत्साह वाढवितो. बरेचवेळा भक्ताला 'हे करू का ते करु' दोन पर्यायामधील कोणता पर्याय निवडू असा संभ्रम पडतो. अशावेळी हा आतला आवाज भक्ताला अंतिम निर्णय घेण्यास मदत करतो. अनेक मोहाच्या प्रसंगी हा अनुमन्ता भक्ताला मोहापासून आवरुन त्याला सन्मार्गावर आणून ठेवतो. हा अनुमन्ता भक्ताच्या मनातील विकारांना आवरुन, धनसत्तेविषयी वाटणारा लोभ ईश्वरप्राप्तीकडे वळवतो, भोगांविषयी वाटणारे प्रेम तो ईश्वरनामाकडे वळवतो. हा अनुमन्ता भक्ताला स्वसुखापेक्षा दुसऱ्याच्या सुखात आनंद मानावयास शिकवतो. थोडक्यात साधनासिद्धीसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या 'निर्वैर शुद्धमन' व 'सदाचार' या दोन गोष्टी भक्ताच्या मनात बिंबवण्यासाठी हा अनुमन्ता प्रयत्नशील राहातो.

याप्रमाणे भक्ताचे मन शुद्ध होऊन, सदाचार अंगी बाणला की त्याची पुढील प्रगत साधनेला सुरुवात होते. साधनेच्या या मुक्कामावर भक्त पाहोचला की, अंतस्थ ईश्वरही अनुमन्त्याची भूमिका सोडून भर्त्याची भूमिका वठवू लागतो. साधनेच्या या पायरीवर पाहोचल्यावर भक्ताची 'देहबुद्धि' कमी कमी होत जाऊन 'देवबुद्धि' वाढू लागते. साधनेत मग्न असताना देहाचे विस्मरण झाल्यामुळे भक्ताकडून एकादेवेळी प्रपंचातील कर्तव्याकडे दुर्लक्ष होण्याच प्रमाद घडू शकतो, अशावेळी हा भर्ता झालेला ईश्वर कार्यरत होतो व ती उणीव भरून काढतो व भक्ताचा निर्वाह चालवून नेतो. गोरोबाकुंभार आपल्या पेशाप्रमाणे माती तुडवण्याचे काम करीत असताना हरिनामात इतका तल्लीन झाला की त्याचे मूलचं मातीत तुडवले गेल्याचेही त्याला कळले नाही. केवढा मोठा प्रमाद त्यांच्याकडून घडला होता. पण तो प्रमाद

नामात तल्लीन झाल्यामुळे अनवधानाने झाला होता म्हणून ईश्वर भर्त्याच्या रुपात धावून आला व त्याचे मूल त्याने सुखरुप परत मिळवून दिले. तुकारामबुवांचे वडिलोपार्जित घर होते, पण त्यांचे कुटुब मोठे व ते स्वतः प्रपंचासाठी काहीच कमावत नव्हते, त्यामुळे घरात त्यांच्या पत्नीला मुलांना खाऊ घालण्यास काय अडचणी आल्या असतील याची कल्पना केलेलीच बरी! त्यावेळी हा 'भर्ता'च त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह चालवत होता, पण तोही अशारितीने की कोठेही रेलचेल न दिसता, तुकाराम बुवांच्या हे नजरेत येणार नाही अशा! कारण तुकाराम बुवानी शिवाजी महाराजांनी पाठविलेले जडजवाहिर, 'हे पाप माझ्या घरात नको म्हणून' सादर परत पाठविले होते. दामाजी पंतांनी दुष्काळग्रस्त लोकांना वाटलेल्या सरकारी धान्याची किंमत याच भर्त्याने, महाराच्या ('झाला महार पंढरीनाथ') रूपात येऊन मोहोरांचा ढीग पाडून बादशहाला फेडली होती. भगवंताने गीतेत ९ व्या अध्यायांतही असेच म्हटले आहे.

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।**
**अ.९/२२**

समश्लोकीः

**अनन्यभावें भक्तीने मला भक्त उपासती।**
**जे नित्ययोगी त्यांचा मी योगक्षेमचि चालवी।।**
**अ.९/२२**

उपासनेच्या वर सांगितलेल्या उच्च-अवस्थेस पोहोचलेल्या, परमेश्वराशी नित्य अनुसंधान साधलेल्या भक्तियोग्यांच्या बाबतीतच, आपले कर्तव्य कर्म करीत असताना देहबुद्धि हरपल्यामुळे झालेल्या उणीवा हा भर्ता भरून काढतो हे येथे तक्षात घेतले पाहिजे. 'असेल हरि तर देईल खाटेवरी' अशा वृत्तीने केवळ आळशीवृत्तीने स्वार्थापोटी कोणी जपमाळ घेऊन स्वस्थ बसेल तर त्याच्या कुटुंबाचा निर्वाह परमेश्वर चालवील असे मात्र कोणी अजिबात समजू नये.

आता भक्ताची उपासना (साधना) याही अवस्थेच्या पलीकडे प्रगत झाली म्हणजे हृदस्थ परमेश्वर त्या भक्ताचा सहभोक्ताच होतो म्हणजे भर्त्याची भूमिका टाकून तो आता भोक्त्याची भूमिका घेतो. या अवस्थेत जिवा-शिवाचे नाते आणखीनच घनिष्ट होते, व भक्ताला द्वैताकडून अद्वैताकडे पोहोचण्याच्या आधीची मधली स्थितीच जणू प्राप्त होते. अशा स्थितीत भक्त जेवून समाधान पावला की त्याच्याशी जोडलेला परमेश्वरही समाधान पावतो व भक्ताला वैश्वानराला तोषविल्याचा दिव्य आनंद (परमानंद) प्राप्त होतो. भक्ताला जर काही खूपले, ईजा झाली तर तेही कृष्णसखाच (सहभोक्ता) झेलतो. संतसखूला सासूने काठीने मारल्याचे वळ कृष्णसखाच झेलत असे. तापलेल्या कालथ्याने तिच्या अंगावर दिलेले डाग कृष्णाच्या अंगावर उठत असत व कृष्णस्मरणात देहबुद्धिच हरपल्यामुळे सखूला मात्र भाजल्याचे काहीच दुःख जाणवत नसे. या अवस्थेत भक्त जे बरे-वाईट भोगतो त्याचा भोग परमेश्वरच

घेऊ लागतो. या अवस्थेत भक्त जरी (वेगळा) द्वैतात असला तरी त्या अवस्थेत जीवा-शिवाचे जवळ जवळ मीलनच झालेले असते. त्यामुळे तो 'परमात्मा' (शिव) जीवाची पाठ अजिबात सोडीत नाही. नामदेवांनी जनीच्या बाबतीत अभंगात असेच म्हटले आहे.

**जनी जाय पाणीयासी, उभा मागे हृषीकेशी।**

संतसखू, जनाबाई यांच्यासारख्या चार इयत्तासुद्धा न शिकलेल्या गावंढळ गृहिणींनी केवळ अनव्यभक्तीयुक्त, संपूर्ण समर्पण भावनेने प्राप्त केलेली ही तुर्या/तुरीया अवस्था एवढी भव्य दिव्य होती, की नामदेवांसारख्या पूर्ण ज्ञानी भकतयोग्यालाही सामान्य जनांना अनन्यभक्तीचे महत्त्व पटवून देण्यासाठी, कृष्ण-जनाबाईंच्या अद्वैताचे वर्णन एवढ्या आदराने करावेसे वाटले.

गीताज्ञान-नवनीताचा ११७ वा श्लोक असा आहे.

**संतसखू जनाबाई दळता कांडताच त्या।**
**अनन्यभक्तिभावेंची गेल्या ब्रह्मपदास त्या ।। ११७।।**

पुढं ११८ वा श्लोक पहा

**कर्मकाण्डी फळाशी जे वेदवेदीहि लोक ते।**
**नच मुक्ति मिळे त्यांना विनाभक्ती अश्रद्ध जे ।। ११८।।**

कितीही ज्ञानी पंडित असला, कर्मकाण्डी असला तरी अनन्यभक्तीशिवाय त्याला मुक्ती मिळत नाही. उलट संतसखू, जनाबाईसारख्या वेदविद्येचा गंधही नसलेल्या गृहिणीना अनन्यभावभक्तीने मुक्ती मिळाली हेच गीताज्ञाननवनीतात अखेरीस सांगितले आहे.

ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी वर्णन केल्याप्रमाणे अर्जुनही गीताकथनप्रसंगी भक्तीच्या या (चवथ्या तुरीया) अवस्थेस पोहोचला होता. त्यामुळे कृष्णवचनामृत ऐकता ऐकता तो अद्वैतावस्थेत जाऊन त्याची समाधीच लागत असे तेव्हा कृष्ण त्याला जागे करून पुन्हा द्वैतावस्थेत आणत असे. कारण कृष्णाला अर्जुनाकडूनच दुष्ट कौरवादिकांना शासन करावयाचे होते. ज्ञानेश्वरांनी अर्जुनाच्या द्वैताद्वैतांत होणाऱ्या येराझारांचे असे वर्णन केले आहे.

अद्वैतात शिरण्यापूर्वीच्या या चवथ्या (तुरीया) अवस्थेत साधक ईश्वरीय अनुसंधानाच्या अल्पशा उत्तेजनानेही अद्वैतावस्थेत समाधीस्थ होऊ शकतो. या शेवटच्या अवस्थेस भक्त पोहोचला की अंतस्थ ईश्वर भोक्त्याची भूमिकाही सोडून त्या भक्ताला आपल्यात पूर्णपणे सामावून घेणारा 'महेश्वर' होतो.

याप्रमाणे, भक्ताच्या भक्तीच्या पायरीप्रमाणे किंवा साधकाच्या साधनेच्या (उपासनेच्या) पायरीप्रमाणे, केवळ उपद्रष्ट्यापासून थेट महेश्वरापर्यंत निरनिराळी रूपे घेणारा जो अंतस्थ ईश्वर त्यालाच परमात्मा किंवा ब्रह्मतत्त्व म्हणतात व त्या परमात्म्याशी अद्वैत साधण्याच्या सिद्धीलाच

मुक्ती किंवा मोक्ष अशी संज्ञा आहे, असेच भगवान् या श्लोकाद्वारे सांगत आहेत. 'मोक्ष' या अंतिम स्थानकाकडे (Terminus) नेणाऱ्या मार्गावरचे निरनिराळे टप्पे किंवा मुक्काम साधकाला भक्तीसाधनेच्या पायऱ्यांनी कसे गाठावयाचे असतात व या प्रत्येक मुक्कामी परमेश्वराशी भक्ताची जवळीक कशी कशी क्रमाक्रमाने दृढ होत जाते याचा आलेखच या श्लोकात दाखवला आहे. असे या श्लोकाचे महत्त्व आहे.

पूज्य दादाजींचे स्मरण करून चिंतनात त्यांचीच अनुमति घेऊन १९९३ साली रविवारच्या प्रवचनात त्यांनी प्रकट केलेले मौक्तिक विचार माझ्या कुवतीप्रमाणे वेचुन एका सरात ओवून वाचकांपुढे ठेवत आहे.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

•••



## व्याधि आणि शत्रु...

**जातमात्रं तु व्याधिं शत्रुंवा प्रशमं नयेत्।
अतिपुष्टांगयुक्तोऽपि सपश्चात्तेन हन्यते।।**

व्याधि आधि शत्रु उत्पन्न होतांक्षणींच समूळ नष्ट केले पाहिजेत. तसें केलें नाहीं तर तें कळत-नकळत हळुहळु वाढतात. आणि त्यांना वाढूं देणारी व्यक्ति कितीही धष्टपुष्ट व बलिष्ठ असली तरी तो वाढलेला रोग आणि बलवान झालेला शत्रु त्या व्यक्तीचा नाश करतात.

आपले शरीर सुदृढ असलें तरी त्याच्याकडे आरोग्याच्या दृष्टीनें सतत लक्ष ठेविलें पाहिजे. तसेंच आपलें कुटुंब, आपलें घरदार, आपलें राष्ट्र यांच्या बाबतींत सतत सतर्क राहिलें पाहिजे. कोणी शत्रु - आंतील वा बाहेरील - डोकें वर करीत नाहीं ना इकडे डोळ्यांत तेल घालून दक्ष राहिलें पाहिजे.

उपेक्षा केली तर व्याधि वा शत्रु आपला नाश करील हें सदैव ध्यानांत असावें.

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

(सद्धर्म एप्रिल १९९७ या अंकातून...)

•••

लेखांक - ५

मागील लेखात आदर्श राजाचे गुण पाहिले. या सर्व गुणांसहच 'विनय' या गुणाला कौटिल्यीय अर्थशास्त्रात विशेष महत्त्व दिलेले दिसते. अर्थशास्त्रात अनेक ठिकाणी 'विद्याविनयसंपन्न' 'विद्याविनीत' अशी विशेषणे राजासाठी अनेकदा योजलेली दिसतात.

विनय गुण म्हणजे नेमके काय? 'विनय' शब्दाचा सर्वपरिचित व्यवहारातील अर्थ म्हणजे 'नम्रता' परंतु अर्थशास्त्रामध्ये मात्र हा शब्द अधिक व्यापक अर्थी स्वीकारला आहे. विशेषणे नीयते 'इति विनयः' जो विशेषपद्धतीने मनुष्याच्या विकासाला गती देतो तो गुण म्हणजे विनय. विनय म्हणजे मनुष्यावर केले जाणारे अथवा होणारे संस्कार.

विनय गुण दोन प्रकारचा आहे. 'कृतक' आणि 'स्वाभाविक'. 'कृतक' म्हणजे 'कृत्रिम्' म्हणजे बाह्य संस्कार. असे संस्कार विद्या प्राप्त केल्याने होतात. खाणीत प्राप्त झालेले अशुद्ध खनिज ज्याप्रमाणे पैलू पाडणे इ. प्रक्रिया केल्याने शुद्ध, तेजस्वी आणि मूल्यवान होते त्याचप्रमाणे विद्येमुळे मूळ व्यक्तिमत्त्व अधिक उजळते म्हणजेच विनयसंपन्न होते. अर्थात विद्येचे हे संस्कार होण्यासाठी मूळ व्यक्तिमत्त्वात, मागील लेखात वर्णन केलेले बुद्धीचे गुण असणे आवश्यक आहे. बाह्य संस्कारांनी योग्य माणसाच्या अंगीच विनयगुण निर्माण होतो, अयोग्य माणसाच्या ठिकाणी नाही. विद्येमुळे मनुष्याच्या ज्ञानात भर पडतेच. परंतु योग्य-अयोग्य, नीति-अनीति, सुगुण-दुर्गुण इ. जाणण्याची क्षमता प्राप्त होते. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची पारख करण्याची क्षमता आणि जागरुकता येते. अशी जागरुकता आल्यावर मनुष्य स्वतःच आपल्या व्यक्तिमत्त्वातील गुण वर्धित करण्याचा प्रयत्न करतो, अवगुण दूर करतो. स्वतःवर संस्कार करण्याची ही प्रक्रिया सतत सुरु राहते. विद्याग्रहणादी गोष्टींमुळे निर्माण झालेली, स्वतःवर संस्कार करण्याची ही प्रक्रिया जीवनशैलीच होते आणि स्वाभाविकपणे अव्याहत होत रहाते. यालाच कौटिल्याने 'स्वाभाविक विनय' म्हटले आहे असे दिसते. या प्रक्रियेत बाह्य संस्कारांची आवश्यकता रहात नाही.

विनयगुण संपन्न झाला की नम्रता, इंद्रियसंयमन, निग्रह, सत्य, विवेक इ. अनेक सद्‌गुण अंगी आपोआप बाणले जातात. विनयगुणाचे महत्त्व मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति इ. धर्मशास्त्राच्या ग्रंथांतही सांगितले आहे. विनयगुणाने संपन्न असलेला राजाच कायद्याची योग्य अंमलबजावणी करतो. प्रजेला योग्य न्याय देतो आणि प्रजेला योगक्षेम प्राप्त करून देतो. लोभ, मोहादी षड्‌रिपुंपासून दूर असल्याने खऱ्या अर्थाने 'राजर्षि' ह्या पदाला प्राप्त होतो. 'राजर्षि' या पदवीमध्ये राजा आणि ऋषि या पदांचा मेळ आहे. राजाच्या व्यक्तिमत्त्वात शौर्य, उमदेपणा या राजाला योग्य अशा गुणांसह

इंद्रियसंयमन, मनोनिग्रह, अनासक्ति इ. ऋषीला योग्य असे गुणही असणे आवश्यक मानले होते. दुर्गुण अथवा व्यसनांच्या आहारी न जाता असा विनयसंपन्न राजर्षी सदैव प्रजाहितदक्ष असतो आणि अर्थातच सम्राटपदही प्राप्त करतो. अखंड पृथ्वीवर राज्य करतो असे कौटिल्य म्हणतो. (विद्याविनीतो राजा हि प्रजानां विनये रतः। अनन्यां पृथिवीं भुङ्क्ते सर्वभूत हिते रतः।।) असा राजा आपल्या प्रजेलाही विनय गुणाने युक्त करतो. अर्थशास्त्र हा ग्रंथ राजासाठी सांगितला असल्याने 'विनय' गुणाचे विवेचन जरी प्रामुख्याने राजाच्या संदर्भात असले तरी अर्थातच ते कुणाही मनुष्याला आवश्यक असेच आहे.

व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असा विनय हा गुण 'विद्या' शिकल्यामुळे प्राप्त होतो असे कौटिल्य म्हणतो या विधानाच्या अनुषंगाने 'राजाचे शिक्षण' आणि कौटिल्यीय अर्थशास्त्रात येणारे 'शिक्षणविषयक संदर्भ' यांचा आढावा पुढील लेखात घेऊ.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

•••

(पृष्ठ क्र.८ वरून **गीतकृष्णायन**)

म्हणून जगन्नियंत्यानंदेखील एक गालबोट लावण्याची योजना करून ठेवली होती बरं का. कोणती? ऐकाच तर तो प्रसंग...

यज्ञाची सांगता होऊ पहात होती. सोमयागानंतरचं शेवटचं अवभृथस्नान तेवढं राहिलं होतं. सोमयागाच्या दिवशी सर्व निमंत्रित स्थानापन्न झाल्यावर धर्मराजानं पितामह भीष्मांना विचारलं, पितामह, अवभृथस्नान करण्याआधी मी करण्यासारखा एखादा विधी राहिला आहे काय?

भीष्म म्हणाले, पुत्रा, या यज्ञाला उपस्थित राहून त्याची शोभा वाढविणाऱ्या सर्व राजांची तू पूजा करावीस.

धर्मानं त्यावर विचारलं, तात, उपस्थितांमध्ये अग्रपूजेचा मान मी कोणाला द्यावा अशी आपली इच्छा आहे?

भीष्मांनी यावर क्षणैक चिंतन करून उत्तर दिलं, ज्याच्या मार्गदर्शनाखाली हा अपूर्व सोहळा संपन्न होतोय अशा त्या जगदेकवीर श्रीकृष्णाखेरीज अग्रपूजेचा दुसरा मानकरी मला तरी दिसत नाही.

हर्षभरानं मग धर्म आणि पांचाली यांनी सर्वप्रथम श्रीकृष्णाची पूजा केली. पण त्यांच्या ह्या कृत्यानं विलक्षण अवमानित होऊन शिशुपाल खवळून उठला...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

# जुन्या भारतीय रूढी व परंपरा आणि आजचा भारत

प्रकाश दीक्षित

हिंदू धर्मात जे सोळा संस्कार संगितलेले आहेत त्याला वैज्ञानिक संदर्भ व अर्थ आहेत. हे पाश्चिमात्य विद्वान व अभ्यासकांनी सखोल अभ्यासांती मान्य केले आहे. गेल्या ७००-८०० वर्षातील पारतंत्र्यात हळू हळू संस्कारांचे महत्व कमी होऊन त्याचे कर्मकांडात कधी परावर्तन झाले ते ना सामान्यांच्या ना विद्वानांच्या लक्षांत आले. वैयक्तिक स्वार्थ व पैसा हाच देव या विचारास व्यक्तिगत आयुष्यात व समाज जीवनांत पिढी दर पिढी मान्यता मिळत गेली. पाठांतर हा मेंदूतील स्मरण पेशी कार्यक्षम करणारा एक सोपा व सुलभ मार्ग आहे हे आज अनेक प्रयोगांती जगाने मान्य केले आहे. ते आपणही मान्य करावयास हवे. गेल्या ७० वर्षांत आपण या बाबत कोणतेही दृष्य प्रयत्न केलेले दिसत नाहीत. आत्ता सुरवात केली तर दोन ते तीन पिढ्यानंतर कांही तरी परिणाम दिसण्याची शक्यता आहे. अन्यथा वाईटा कडून अधिक वाईटा कडे जाण्याची ही प्रक्रिया कशी थांबवणार? मानव हा समाजशील प्राणी आहे हे समजल्यानंतर व दोन व्यक्तितील पिंडे पिंडे मतीर्भिन्ना: या सत्याचा विचार समाज रचना व बांधणी करताना केला गेलेला दिसतो. यातूनच वर्ण निर्माण केले गेले असण्याही शक्यता दिसते. त्यातच नंतर जाती व पोटजाती निर्माण झाल्या असाव्यात. त्या वेळच्या स्त्रीची शारीरिक मानसिक क्षमता लक्षांत घेऊन स्त्रीने चूल-मूल सांभाळावे व पुरुषाने चारितार्थासाठी धन मिळवावे व संरक्षण करावे अशी विभागणी झाली असावी. त्यात कालानुरूप जे बदल करणे गरजेचे होतो त्याचा विचार कोणी केला नाही हे याचे महत्वाचे कारण असावे. याचे एक कारण असेही असावे कीं बदल न झाल्याने स्त्री बाबत ज्या रूढी-परंपरा पुरूषांना सोईस्कर वाटत असल्याने त्यात मोठे बदल करण्यात त्यांनी पुढाकार घेतला नसावा. गेल्या १००-१५० वर्षात सावित्रीबाई व महात्मा फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे, आगरकर, न्या. रानडे, राजा राम मोहन रॉय या सारख्या अनेक समाजसुधारकांनी मोठे कार्य केले. त्यामुळे समाज व्यवस्थेत मोठा फरक पडला. स्त्रियांची मोठ्या प्रमाणात प्रगती होताना दिसली. पण याच काळात शतकानुशतके भारतात स्थिरावलेली एकत्र कुटुंब पद्धती हळू हळू मोडीत निघाली. त्यामुळे या पद्धतितील फायद्याकडे काणा-डोळा करत विभक्त कुटुंबाचे फायदे मोठे आहेत असे प्रतिपादन केले गेले. यात औद्योगिक क्रांतिचा परिणाम म्हणून उद्योगधंदा, नोकरी व्यवसाय तसेच राहत्या जागेची कमतरता यामुळे करावे लागणारी स्थलांतरे ही सर्व कारणेही तितकीच महत्वाची होती. दळणवळणाच्या साधनांची गती वाढणे याचाही मोठा वाटा होता. हे होत असताना तत्कालीन सोय पाहून इतर गोष्टी कडे दुर्लक्ष होत होते.

आज निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करून या विचारास योग्य दिशा देण्याची

गरज निर्माण झाली आहे. हे आपल्या सर्वांस पटेल असे वाटते. हे कसे करता येईल त्याचा विचार एक दोघांनी विचार सुरू करून भागणार नाही. त्यासाठी सर्व विचारवंतांनी व संबधितांनी एकत्र येऊन सुरवात केली पाहीजे.

याची सुरवात म्हणून खालील कांही मुद्दे विचारात घेण्या जोगे वाटतात. :

१. मानवांनी आपली बुद्धी व चातुर्य याचा उपयोग करून निसर्गावर मोठ्या प्रमाणात मात केली. पण हे करतांना आपण मिळवले काय व गमावले काय याचे गणित मांडले नाही. परिणामी आजची परिस्थिती समोर येत आहे. यंत्रे तयार करून आपले शारीरिक व बौद्धिक श्रम कमी केले. पण ते होताना त्याची शारीरिक व बौद्धिक श्रम करण्याची क्षमता हळू हळू कमी होत लयाला जात आहे याचा त्याला विसर पडला आहे. काम कमी झाल्याने जो मोकळा वेळ मिळू लागला व अधिक पैसा मिळू लागल्याने त्याचा तो भोगवादी झाला व आपली विचार शक्ति वापरेनासा होताना दिसत आहे. मानव हा अनुकरणशील प्राणी आहे, दुसऱ्यांचे मी अनुकरण केले असे कारण देत आपले समर्थन करत जातो.

२. वसुधैव कुटुंबकम् अशी कुटुंबाची व्याख्या शेकडो वर्षापूर्वी करणारा हिंदू धर्म व भारत देश हा एकमेव असावा. न स्त्री स्वातंत्र्यम आर्हती हा एकमेव संदर्भ देऊन लोकांत स्त्रियांना स्वातंत्र्य हिंदू धर्म देत नाही असा प्रचार कितपत योग्य आहे याचा विचार झालाच पाहिजे. याच हिंदू धर्माचे भारतात गार्गी, मैत्रेयी, लीलावती या सारख्या अनेक स्त्रियांचे जे संदर्भ आहेत ते विसरून कसे चालेल. हे संदर्भ जुने व थोडे असतील पण आहेत. जे अभ्यास करतील त्यांना अधिक नोंदी आजही मिळु शकतील. नंतरच्या काळातील राजकीय व सामाजिक बदलांचा परिणाम म्हणून तशा स्त्रिया कमी झाल्या असतील. पण राजकारण, समाजकारण, विज्ञानात राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई पासून इंदिराजी, सिंधूताई, कल्पना चावला पर्यन्त अनेक स्त्रिया झाल्या आहेत व त्यांना मानसन्मान मिळाले व मिळत आहेत.

३. कुटुंब संस्थेतील कालानुरूप होत गेलेले बदल लक्षांत घेऊन जे बदल होणे आवश्यक होते ते न झाल्याने हा परिणाम आहे असे म्हणावे लागेल. सद्यपरिस्थितीचा परिणाम म्हणून ही स्थिति निर्माण झाली आहे हे जरी खरे आहे तरी त्यावर मार्ग शोधणे व त्या साठी समाज व राज्यकर्ते राजकरणी यांनी एकत्रित पणे प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे हे ओळखलं पाहिजे व त्या दिशेने प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. असे झाले तरच कांही काळा नंतर सर्व स्तरावर त्याचा उपयोग झालेला दिसू शकेल.

४. वरील विषयावर हे विचार मी मांडत असलो तरी ते परिपूर्ण आहेत असा माझा दावा नाही. अधिक दिशा व विचार जर मांडले गेले तर त्याला नवीन दिशा व स्वरूप मिळेल असा माझा विश्वास आहे. आपण आपले विचार पाठवलेत तर योग्य त्या शिफारसी सरकारकडे पाठवताना उपयोगी पडतील.

**प्रकाश दीक्षित**

भ्रमणध्वनी :९८१९६९३१९५

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

आर्युवेद, यामध्येही या ऋतुंमुळे शरीरात होणारे बदल, आणि त्याचा आपल्या आहाराशी असलेला संबंध याचा सखोल विचार केला गेला आहे. एवढेच काय पण आपल्या शास्त्रीय संगीतामधले रागही दिवसाच्या ठरलेल्या वेळीच गायचे संकेत आहेत.

पावसाचा संबंध शेतीशी आहे हे वेगळं सांगायला नकोच, आपल्या आजच्या जीवनशैलीमुळे आपण निसर्गाचा समतोल बिघडवला. त्यामुळे तापमान, आणि पावसावरही त्याचा परिणाम झाला हे आता सर्वमान्य आहे. पण याही पलीकडे निसर्ग, आणि पावसाचा असलेला संबंध नाकारता येत नाही. यामुळे पावसा प्रमाणे दुष्काळ का पडतो याचाही अभ्यास करावा लागतो. शेतकरी हा सध्या राजाकरणाचा विषय असल्यामुळे अशा मुलभूत संशोधनाकडे साहजिकच आपले दुर्लक्ष आहे. १८९६ साली मोठा दुष्काळ पडला होता. या संदर्भात ग्रह आणि निसर्गचक्र याचा सूक्ष्म अभ्यास करून दामोदर भास्कर बापट यांनी ''पर्जन्य नूतन विचार'' हे अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले. आज ते दुर्मिळ आहे.

आकाशस्थ ग्रह-तारे, सूर्य-चंद्र यांचे भ्रमण, त्यांचे परस्पर संबंध या सगळ्याचा सारासार विचार करून व्यवहार्य जीवनाकरता कालमापनाची पद्धत पंचांग आपल्याला उपलब्ध करून देते.

जगातल्या सगळ्या प्राचीन संस्कृतीनी पंचांग निर्माण केलेली आहेत. अर्थातच हिंदू संस्कृतीही त्याला अपवाद नाही.

पंचांग निर्मिती ही एक अत्यंत गुंतागुंतीची, चिकित्सक पद्धत आहे. तिथी, वार, नक्षत्र, योग आणि करण या पाच अंगांचा विचार पंचांगामध्ये केलेला असतो. दिवस, आणि रात्र हे दिवसाचे भाग आपल्याला वेगळे सांगावे लागत नाहीत. पण ग्रह नक्षत्रांची खगोलीय परिस्थिती मात्र अनेक निरिक्षणानंतरच निश्चित करता येते. शिवाय त्यांचे स्वतः भोवतीचे आणि पृथ्वीचे सूर्याभोवतीचे भ्रमण यांचाही ताळमेळ पंचांग लिहिताना विचारात घ्यावा लागतो.

कालगणना, आणि कालनिर्देश ही पंचांगाची प्रमुख कार्ये आहेत.

आपल्या दैनंदिन जीवनातल्या घटनांप्रमाणेच, आपण साजरे करत असलेले सगळे सण, आणि संस्कार यांची योग्य वेळ ठरवण्याकरता पंचांगाचा वापर केला जातो. वैदिक काळामध्ये दिवस, नक्षत्रे, ऋतू यांचा संबंध वेगवेगळ्या कृत्याशी जोडलेला आढळतो. काही अभ्यासकांच्या म्हणण्याप्रमाणे यातूनच पंचांग निर्मिती झाली असावी. साहजिकच गेल्या ५००० वर्षामध्ये, या कालमापन पद्धतीमध्ये, स्थित्यंतर झालेली दिसतात.

पंचांगाचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे गणित शास्त्राची निर्मिती.

ज्योतिष म्हणजे प्रामुख्याने ग्रहगणित

(Astronomy). फलज्योतिष (Astrology) हा त्याचा एक भाग आहे. १० व्या शतकातील श्रीपती, १२ व्या शतकातील भास्कराचार्य, आणि १५ व्या शतकातील गणेश देवज्ञ ते १९ व्या शतकातील बापूदेव शास्त्री या मराठी गणित्यांचे या विषयाला मोठे योगदान आहे. ग्रहगणिताची त्यांची कोष्टके आणि ग्रंथ सबंध भारतभर पंचाग निर्मितीकरता वापरले गेले आणि आजही जात आहेत. दुर्दैवाने आपल्या गणिताच्या किंवा इतिहासाच्या पुस्तकांमधून यांची माहिती अभावानेच देण्यात येते.

वैदिक काळापासून आजपर्यंत अक्षरशः काही हजारोंनी ग्रंथ यावर लिहिले गेले आहेत. Theodor Aufrecht या जर्मन अभ्यासकानें १८९१ मध्ये संस्कृत ग्रंथांची एक मोठी सूची तयार केली. त्यावेळी त्यामध्ये सुमारे दोन हजार ज्योतिष ग्रंथ नोंदवले गेले आहेत. David Pingre यांनी पाच खंडामध्ये Census of the Exact Sciences in Sanskrit याचे संकलन केले आणि हजारो भारतीय गणिती आणि त्यांनी लिहिलेल्या हस्तलिखितांची सूची तयार केली. १८९६ साली शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास हे अत्यंत महत्त्वाचे पुस्तक लिहिले. ग्रहगणित, आणि पंचांगावरती अजूनपर्यंत इतकी चांगली माहिती देणारे पुस्तक निर्माण झालेले नाही. थिबो या एका संस्कृत संशोधकाला दीक्षितांच्या पुस्तकातली माहिती एवढी महत्त्वाची वाटली, की त्याकरता तो मराठी शिकू लागला. दीक्षितांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये पुण्याच्या आनंदाश्रमामध्ये पाचशे ज्योतिष ग्रंथ असल्याची माहिती त्यावेळी दिली आहे. दीक्षितांच्या पुस्तकाच्या हिंदी आणि इंग्रजीतील भाषांतरीत प्रती भारत सरकारने आता उपलब्ध करून दिल्या आहेत. आज सुमारे ७०,००,००० हून अधिक संस्कृत हस्तलिखितांची सूची उपलब्ध आहे. अर्थातच वर दिलेल्या सूच्यांमध्ये नसलेले हजारो ज्योतिष ग्रंथ यामुळे आज आपल्याला समजले आहेत. प्रतीक्षा आहे ती या ज्योतिष, गणित ग्रंथाच्या तौलनिक अभ्यासाची.

दुर्दैवाने खागोलीय ग्रहताऱ्यांचा प्रत्यक्ष वेध घेऊन पंचांगातील गणित मांडणे मध्ययुगिन काळामध्ये तुलनेने कमी होऊ लागले. भारतामध्ये यामुळेच ३० हून अधिक पंचांगे वापरात आली.

पंचांगात सुधारणा करण्याचा पहिला प्रयत्न शिवाजी महाराजांनी ३०० वर्षापूर्वी केला. कृष्ण नावाच्या एका ज्योतिषाला प्रत्यक्ष वेध घेऊन ज्योतिष ग्रंथ लिहायला सांगितला. ''करण कौस्तुभ'' नावाचा ग्रंथ याकरता त्यांनी लिहिला. इ.स. १८७६ मध्ये पंडीत बापूदेव शास्त्री यांनी नविन पंचांग लिहिले. १९/२० व्या शतकामध्ये छत्रे, लेले, मोडक आणि दीक्षित यांनीही सायन किंवा निरयन पद्धतीवर आधारित पंचांगांची निर्मिती केली. व्यंकटेश बापूजी केतकर यांनीही ''केतकी'' नावाचे एक पंचांग सुरु केले होते. १९०४ साली मुंबई येथे पहिले

ज्योतिष संमेलन भरले होते. त्यामध्ये रैवत पक्षाच्या तत्त्वांचा पुरस्कार करून सर्व पंचांगामध्ये एकवाक्यता आणावी हा विचार लोकमान्य टिळकांनी मांडला होता. अर्थातच लोकमान्य टिळकांनी लिहिलेले नवीन पंचांग आपल्या सर्वांना माहिती आहेच.

पंचांगामध्ये एकसूत्रता आणण्याकरता भारत सरकारनी १९५२ मध्ये प्रसिद्ध शास्त्रज्ञ मेघनाथ साहा यांच्या अध्यक्षतेखाली पंचांग सुधारणा समितीची नियुक्ती केली. या पंचांगामध्ये परंपरागत शकगणना आणि ग्रेगरीयन कालगणनेचा वापर करून नवीन पंचांग तयार केले. २२ मार्च १९५७ मध्ये (१ चैत्र शके १८७९) भारत सरकारने ते प्रत्यक्षात अंमलात आणले.

सखोल गणिताच्या अध्ययनाशिवाय कुठलेही पंचांग निर्माण करता येत नाही. शून्य असो, आकडे असोत, Trignometry किंवा Calculus असो, यांची निर्मिती भारतात का झाली, हे कळण्याकरता पंचाग म्हणजेच ज्योतिष किंवा ग्रहगणिताच्या विकासाच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. आजची आधुनिक उपकरणे तर सोडाच, पण दुर्बिण सुद्धा या अभ्यासाकरता उपलब्ध नव्हती. याच पंचांगाचा उपयोग भारतीयांनी त्यांच्या नौकानयामध्येही केला. वास्तविक पाश्चात्य जगतामध्ये पंचांग (Calender) सुधारण्याची सुरुवात १६ व्या शतकात होण्याचे एक कारण, नौका नयनातील अडचणी हेही होते. यातूनच ग्रेगरियन (Gregorian) कालमापन पद्धतीला सुरुवात झाली.

ख्रिस्तपूर्व काळात पाश्चात्य देशांमध्ये रोमन पंचांग (Calender) चालू होते. साहजिकच पंचागातील कालमापन आणि वस्तुस्थिती यांचा मेळ बसत नव्हता. Jullius Caesar यांनी यामध्ये सुसुत्रता आणण्याकरता ख्रिस्तपूर्व ४५/४६ मध्ये रोमन पंचागांमध्ये सुधारणा केल्या. त्यानंतर या सुधारित पंचांगाला 'ज्युलियन' पंचांग असे संबोधिले जाऊ लागले. काही शतकानंतर पुन्हा पंचांगामधील दिवस, आणि वस्तुस्थिती यामध्ये तफावत दिसू लागली. इ.स. ३२५ मध्ये Nicaea येथे ख्रिस्ती धर्म परिषद भरली होती. त्यावेळेस २१ मार्च हा वसंतसंपाताचा दिवस ठरवण्यात आला. ईस्टर हा ख्रिस्ती धर्माचा सर्वात महत्त्वाचा सण. ख्रिस्ताचे पुनरुत्थान त्यावेळी झाले असे समजण्यात येते. म्हणूनच या सभेमध्ये असेही ठरवण्यात आले की, २१ मार्च नंतरची लगेच जी पौर्णिमा असेल, त्यानंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी, ईस्टर साजरा केला जाईल. हजार वर्षानंतर पुन्हा एकदा सूर्य, आणि ईतर ग्रहताऱ्यांच्या आकाशस्थ परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास न केल्यामुळे तयार झालेली पंचांग, आणि वस्तूस्थिती यामध्ये बरीच तफावत निर्माण व्हायला लागली.

१६ व्या शतकामध्ये पुन्हा एकदा ईस्टर सण साजरा करण्याकरता या तफावतींमुळे अडचणी येऊ लागल्या. या अडचणी दूर करण्याकरिता पोप ग्रेंगरी (Gregory) XIII

यानी पंचांग सुधारण्याकरता अभ्यासकांना पाचारण केले. २४ फेब्रुवारी १५८२ ला या सुधारणेवर व्हॅटिकनने शिक्कामोर्तब केले. पंचांग (Calender) वस्तुस्थिती दर्शक होण्याकरता त्यामधून १० दिवस काढून टाकण्यात आले. ४ ऑक्टोबर नंतर एकदम १५ ऑक्टोबर अशी पंचागामध्ये सुधारणा करण्यात आली. या सुधारीत पंचांगाला 'ग्रेगरिन' पंचाग असे संबोधण्यात येऊ लागले. आजतागायत हेच पंचांग सर्व जगात प्रमाण पंचांग म्हणून वापरण्यात येते.

युरोपमधील बहुतेक सर्व कॅथोलिक देशांनी हे पंचांग वापरायला सुरुवात १६ व्या शतकातच केली असली तरी, इंग्लंड हा प्रोटेस्टंट देश असल्यामुळे इंग्लंडमध्ये त्याचा स्वीकार व्हायला इ.स. १७५२ साल उजाडायला लागले. अर्थातच यामुळे त्यावेळी वापरात असलेल्या ज्युलियन पंचागातून ११ दिवस कमी करायला लागले. न्यूटनच्या या देशात शास्त्रावर आधारित या बदलाला काही प्रमाणात विरोध सहन करावा लागला याची नोंद घेणे म्हणूनच आवश्यक आहे.

वैज्ञानिकांमध्ये आजही या पंचांगामध्ये बदल करून ते अधिक सोपे करण्याचा आग्रह आहे आणि तसा प्रयत्नही चालू आहे.

सर्वत्र वापरात असलेले आजचे ग्रेगरीयन पंचांग प्रामुख्याने वार, महिना आणि वर्षापुरतेच मर्यादित आहे. हिंदू पंचांग अधिक व्यापक असून सुर्योदय ते सूर्यास्तापासून ग्रहांच्या स्थित्या, ऋतू इ. अनेक व्यावाहारीक आणि सांस्कृतिक गोष्टी त्यामध्ये दिलेल्या असतात. भारत हा एक खंडप्राय देश आहे. सांस्कृतीक आणि भाषिक विविधतेमुळे, अनेक वेळा प्रयत्न करुनही या पंचांगामध्ये एकवाक्यता येत नाही ही एक दुर्दैवी गोष्ट आहे.

भारतीय पंचांग अधिक वस्तुस्थिती दर्शक करण्याकरता भारतीय ज्योतिषांनी वेध घेण्याकरता अनेक यंत्रांची निर्मिती केली. ५ व्या शतकापासून पंचांग तयार करण्याकरता सिद्धांत ग्रंथाचा प्रामुख्याने वापर करण्यात आला. या सगळ्या ग्रंथांचा सखोल अभ्यास करून जपानी अभ्यासक Yukio Ohashi यांनी १५९ पानांचा प्रबंध Astronomical Instruments in classical siddantas या शीर्षकाखाली Indian Journal of History of Science 21 (2) च्या १९९४ च्या अंकात प्रकाशित केला. यातली अनेक यंत्रे आज भारतात उपलब्ध नाहीत. अनेक महत्त्वाची यंत्रे पाश्चात्य संग्रहालयात बघायला मिळतात. जगातल्या अशा सगळ्या यंत्रांची सूची करण्याचे काम सध्या S. R. Sarma हे करत आहेत. हा अभ्यास हे भारताच्या विज्ञान इतिहासाचे फार मोठे साधन आहे. शर्मांच्याच शब्दात सांगायचे तर,

"The value of scientific instruments as a source for the history of science and technology cannot be underestimated. In India, various kinds of astronomical and time-measuring instruments have been in use since time

immemorial. Their construction and use are discussed in a numer of Sanskrit texts. While a few such texts have been published, the instruments themselves did not receive much scholarly attention."

या पार्श्वभूमीवर आज आपण ज्या पद्धतीने गुढीपाडवा साजरा करतो ती एक चिंतेची बाब आहे. आता तो गुढीपाडवा नसून 'ढोलबडवा' पाडवा आहे. ढोल वाजवण्याचा आणि गुढीपाडव्याच्या परंपरेचा काडीचाही संबंध नाही.

अस्मिता आणि तरुणांचा उत्साह, कर्तव्य आणि सृजनशीलतेचाही या बडवण्याशी काहीही संबंध नाही. या गोष्टींशी फारसा संबंध नसलेले राजकारणी आणि सर्व माध्यमांनी मात्र तसा आभास निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. परंपरेचा ढोल वाजवत आपला गुढीपाडवाही आता दहिहंडी, नवरात्र आणि गणेश उत्सवाच्या वाटेनीच वाटचाल करतांना दिसत आहे.

हिंदू परंपरेचे आणि सणांचे यापेक्षा दुसरे कुठले मोठे दुर्दैव असणार?

•••


**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे–४०० ६०१**

**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**

**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**

**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**

**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**

**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**

**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही – अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर

**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१

**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१